विषय
सं. क्र. 283

# आइये हिमालय यात्रा



REFBK-0007884
REFBK-0007884

# माझी हिमालय-यात्रा

★

REFBK-0007884

महादेवीताई

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | माझी सहयात्री | १ |
| २. | यात्रेची तयारी | ४ |
| ३. | यात्रा-स्थानांतील अनुभव | ५ |
| ४. | हिमगिरीचें प्राकृतिक दृश्य | १२ |
| ५. | यात्रा-स्थानें | २० |
| ६. | तीर्थ-क्षेत्रें | ४३ |
| ७. | परतीचा प्रवास | ७४ |

# प्रस्तावना (१)

महादेवीची हिमालयाची यात्रा वीस वर्षापूर्वींची घटना आहे. इतके दिवस हस्त-लिखित पडीत ठेवलें होतें. लेखन घाईनें प्रकाशांत न आणतां कांहीं दिवस अप्रकाशांत ठेवल्यानें त्यांतील सत्त्व पारखतां येतें. जमीन जशी पडीत ठेवावी तसें लेखन हि पडीत ठेवणें लाभाचें ठरतें.

हिमालयावर पुस्तकें अनेक झालीं आहेत, तथापि त्याच्या स्फूर्ति-गंगेचा प्रवाह अखंडित च रहायचा आहे प्रस्तुत हिमालयाची यात्रा साहित्यिकाची कृति नाहीं. साधक-वृत्तीच्या सेविकेची कृति आहे. त्या दृष्टीनें ती वाचकांना हृद्य होईल.

शारीरिक धैर्याची कसोटी हिमालय नेहमीं च पाहतो. पण या यात्रेंतील यात्रिकांच्या मानसिक धैर्याची हि कसोटी पाहिली गेली. सदर कसोटींत उत्तीर्ण झालेली सेविका हिमालयाच्या आदर्शानुसार आज तागाईत लोक-सेवेंत स्थिर झालेली आहे.

मी हिमालयांत जाण्यासाठीं घरून निघालों होतों. पण आतां ती इच्छा उरलेली नाहीं. ती केव्हांची च पुरी झाली आहे. कारण चित्ताला स्थिरता लाभली आहे. स्थिर-वृत्तीनें निष्काम सेवाकार्य करणारे सोबती लाभले आहेत. कशाची उणीव राहिली नाहीं.

पडाव : पुडुपाट्टि
(मदुरा) तामिळनाड ८-१२-५६

—विनोबा

# प्रस्तावना (२)

[ही प्रस्तावना हरवल्यामुळें दुसरी लिहिली आणि ती पहिली मागून सांपडली. म्हणून दोन्ही प्रस्तावना दिल्या आहेत. मागून लिहिलेली आधीं, आधीं लिहिलेली मागून.
—प्रकाशक ]

महादेवींची हिमालय-यात्रा झाल्याला १७ वर्षे होऊन गेलीं आहेत. त्यांनीं ती लिहून हि तेव्हां च ठेवली होती. इतक्या दिवसांनंतर आतां ती प्रकाशांत येत आहे

या वर्णनांत साहित्याचा फारसा गंध नाहीं. कारण लेखिकेची साहित्यांत गति च नाहीं. त्यांच्या जीवनांतील मुख्य गुण सत्य-निष्ठा, साहस, आणि निर्भयता, यांत उमटलेले दिसतात.

परमेश्वराच्या कृपेनें लाभलेल्या बाल-वैधव्याचा उपयोग महादेवींनीं निरंतर जनसेवेकडे केला. ३०-३२ सालीं कर्नाटकांतील गांवागांवांत हिंडून शेंवटीं जेलयात्रा अनुभवली. पुढें वर्ध्याच्या आश्रमांत दाखल होऊन हिमालय-यात्रा केली. त्यानंतर हिंदीचा अभ्यास करून एका हिंदी-भाषी हरिजन बालिकेचें पालन-संवर्धन केलें. सनातनी ब्राह्मण कुटुंबांत हें कसें चालणार ? त्यामुळें अनेक वर्षें वडिलांकडे भेटायला जाण्याचा हि इनकार केला. 'येईन तर हरिजन मुलीसह येईन,' अशा सत्याग्रही निश्चयानें शेंवटीं वडिलांना जिंकून घेतलें, आणि हरिजन मुलीसकट वडिलांकडे खाणें-पिणें, राहणें, यथासांग संपादिलें. पुढें गांधीजी आणि जमनालालजी यांच्या सेवेंत राहून, शेंवटीं आतां त्यांचें माझ्या बरोबर सतत परिभ्रमण चालू आहे.

अशा वीर, साहसी, निष्ठावान, सेविकेच्या साध्या लेखनांत हि साहजिक च एक विशेष गोडी आहे. वाचकांना तिचा स्पर्श होईल आणि त्यांना हि भक्ति-विरक्तीचा थोडा छंद लागेल अशी मी आशा करतों.

बिहार-यात्रा १५-९-५२
—विनोबा



लेखिका

२१९५ १ २८३ १५।९।१०

# माझ्या सह-यात्री

मी महिलाश्रमांत शिकत असतांना आमच्या शिक्षकांनीं हिमालयाची माहिती एकदां सांगितली. त्यावेळीं त्यांनीं शिकविलेल्या गाण्यांतील खालील दोन ओळी अजून हि मला आठवतात.

" श्री गिरिवर गिरिराज हिमालय, सुषुमा सागर,
है निसर्ग दिव्य दृश्योंका आगर ॥ "

वरील पद्यामुळें माझ्या डोक्यांत रात्रंदिवस हिमालय-यात्रेचे विचार घोळूं लागले. कसें जावें ? बरोबर कोणाला न्यावें ? अशा कठिण यात्रेंत कोण बरोबर येण्यास तयार होईल ? वगैरे प्रश्न डोळ्यासमोर उभे होत. इतक्यांत माझ्या विचारांना उत्तेजन देणाऱ्या एका इंग्रज महिलेची सत्संगति मला लाभली, व माझे सर्व प्रश्न सुटले.

क्र. ८८८४

ह्या इंग्रज महिलेबाबत येथें चार शब्द लिहिल्याशिवाय राहवत नाहीं. ह्यांचा जन्म कॅनडा देशांतला, पण राहत होत्या इंग्लंडांत. सुखवस्तु घराण्यांतल्या असून हि ब्रह्मचर्याचें व्रत घेतलें होतें. इंग्लंडमधें शिक्षिकेचें काम करीत, व त्यामुळें जी कांहीं प्राप्ति होत असे तींतून अधिकांश भाग वर्ध्याच्या ग्रामोद्योग संघाला नि:स्वार्थ भावनेनें दान देत असत. त्या क्वेकर संप्रदायाच्या होत्या, व फार त्यागी अणि संयमी होत्या. चेहऱ्यावरून कठोर दिसत, पण खरोखर फार दयाळु होत्या. दीन-दु:खी लोकांना पाहून त्यांचें अंत:करण द्रवत असे. हिंदुस्थानांतील ग्रामीण जनतेची दु:खद स्थिति पाहून त्या फार दु:खी होत असत. गीता व रामायण यांवर त्यांची अपूर्व

श्रद्धा होती. इतकी कीं, हे दोन्ही ग्रंथ मुखोदगत करावे असें त्यांना वाटत असे. पण उच्चारभेदाच्या अडचणीमुळें त्यांची ही इच्छा पूर्ण झाली नाहीं.

महात्मा गांधीजींचा सत्संग लाभावा व भारतीय संस्कृतीचा अभ्यास करावा अशा उद्देशानें ह्या बाई वर्ध्यास महिलाश्रमांत राहण्यास आल्या, तेव्हांपासून माझा त्यांच्याशीं विशेष परिचय झाला. त्यांचें भारतीय नांव 'ताराबाई' ठेवण्यांत आले. त्यांनीं हिंदी भाषेचें अध्ययन सुरू केलें. येथें येतां च त्यांनीं पाश्चात्य पोषाख इत्यादि सोडला; इतकें च नव्हे तर पाश्चात्य औषधें हि वापरायची नाहींत असें ठरविलें. कोणी भारतीय आपल्याशीं इंग्रजींत बोलूं लागला तर तो आपला अपमान आहे असें त्यांना वाटत असे; इतक्या त्या हिंदुस्थानी बनल्या होत्या. स्वभाव कांहींसा हट्टी होता. त्यामुळें कांहीं चांगली कल्पना मनांत आली कीं ती पूर्ण केल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे.

त्यांना पूज्य महात्माजींजवळ येऊन दोन वर्षें झालीं होतीं. महात्माजींच्या संमतीनें एका खेडेगांवांत राहून ग्रामसेवा करीत होत्या. स्वत: माती खणून घराच्या भिंती त्यांनीं आपल्या हातानें घातल्या होत्या. भारतांतील दीन-दु:खी जनतेच्या कल्याणासाठीं कोणकोणते विचाररूपी भांडवल त्यांच्या डोक्यांत सांठलेलें होतें तें देव च जाणे ! बापूजींवर ( म. गांधीजी ) हृदयांत अपार श्रद्धा होती व नेहमीं त्यांचें अनुकरण करण्याचा प्रयत्न करीत. पण नेहमीं बापूच्या जवळ राहणें त्यांना योग्य वाटत नसे. त्या म्हणत, " नेहमीं बापूंच्याजवळ राहिल्यानें त्यांच्या आदर्शाबद्दल आपली श्रद्धा कमी होते, जीवनांतील स्वावलंबन कमी होतें; व बापूंच्या ग्रामोद्योगाच्या मुख्य कार्यांत हि बाधा येते. जेव्हां जेव्हां

मला बापूंची भूक लागते तेव्हां मी त्यांना भेटतें." एवढ्यावरून ताराबाईची भूमिका किती उच्च होती याची कल्पना आपण करूं शकतों.

बापूंचे विचार ताराबाईंना पटले असल्यामुळें हिंदुस्थानच्या सेवेचे विचार नेहमी त्यांच्या मनांत घोळत असत. जगांतील प्राणिमात्रांचें हित करणें हा च स्वार्थ, असा त्यांचा सिद्धांत होता. हिंदुस्थानांतील दीन दरिद्री जनतेच्या सेवेखेरीज दुसरें कांही च त्यांना सुचत नसे. त्या 'श्रेय' मार्गी बनूं इच्छीत होत्या. हिंदुस्थानच्या सेवेसाठीं व्यक्तिगत वासना-इच्छांची त्यांनी होळी केली होती. गांवकऱ्यांच्या हृदयांत प्रवेश मिळवून त्यांचें दारिद्र्य निवारण करण्याची भावना नेहमीं जागृत असे. अशा प्रकारच्या बहुगुणी ताराबाईच्या नांवामागें आतां 'स्वर्गीय' शब्द लावतांना मला सहज च दुःख होतें. त्यांचा भौतिक देह नष्ट झाला असला तरी परिचित मंडळींच्या हृदयांत, ' मरावें परी कीर्तिरूपें उरावें' ह्या वचनानुसार त्यांची स्मृति सदा राहील च.

ताराबाई वर्धा आश्रमांत राहण्यास आल्या तेव्हांपासून च माझी त्यांच्याशी दोस्ती जमली. आमचें खाणें-पिणें, फिरणें, बरोबर च होई. एके दिवशीं हिमालय-यात्रेचा माझा विचार मीं त्यांना सांगितला. त्यांना तो फार आवडला. नंतर इतर हि तीन मैत्रिणी आमच्याबरोबर येण्यास तयार झाल्या. ह्या तीन मैत्रिणी देवकीबेन, लीलाबेन, आणि नीलबेन होत.

० ० ०

# २

## यात्रेची तयारी

आम्ही पांच हि जणी गुरुजनांचा आशीर्वाद घेऊन, ता. ३-५-३५ रोजीं सकाळीं यात्रेच्या उत्साहानें आणि हर्षभरित अंतःकरणानें वर्धा आश्रमांतून निघालों. हरिद्वारपर्यंत आमचे एक अध्यापक सत्यदेवजी आमच्याबरोबर होते. चार तारखेस आठ वाजतां सकाळीं आम्ही दिल्लीस पोंचलों. दिवसभर गांधी आश्रमांत थांबून रात्रीं ९ च्या गाडीनें हरिद्वारला रवाना झालों. तारीख ५ ला सकाळीं ९ वाजतां हरिद्वार स्टेशनवर उतरून गुरुकुल कांगडींत गेलों. तेथें सत्यदेवजींच्या बंधूच्या घरीं आम्हीं मुक्काम केला. पुढील यात्रेसाठीं जेवढें सामान अत्यंत आवश्यक होतें, व आम्ही स्वतः वाहूं शकत होतों, तेवढें बरोबर घेऊन बाकीचें त्यांच्याकडे ठेवलें. कपडयांपैकीं प्रत्येकीनें दोन साडया, दोन ब्लाऊज, दोन चड्डया दोन सदरे व एक घोंगडी एवढें सामान बरोबर घेतलें होतें. ओझें कमी करण्याच्या दृष्टीनें जास्त सामान बरोबर घेण्याची हिंमत होत नव्हती. परंतु प्रवासांत अनुभवांतीं लक्षांत आलें कीं, कमींत कमी दोन घोंगडया आवश्यक होत्या. एक च घोंगडें घेतल्यामुळें आम्हांला त्रास हि झाला. आम्ही एक गरम सदरा हि बरोबर घेतला होता. ताराबाईनीं उनी जुराबोचे दोन जोड हि घेतले होते. पण तो पोषाख आम्हांला श्रीमंती थाटाचा वाटला, म्हणून त्याचा उपयोग केला नाहीं. आम्ही तर गरिबांच्या पद्धतीनें यात्रा करणार होतों. म्हणून विशेष आजाराचे वेळीं च त्याचा

उपयोग करणें योग्य असें आम्हीं ठरविलें. प्रवासांत ठेच वगैरे लागली तर पट्टी बांधण्यासाठीं कांहीं स्वच्छ धुतलेले जुने कपडे हि बरोबर घेतले होते.

हरिद्वारच्या सर्व परिचित मंडळींनीं आम्हांस सांगितलें कीं, चपला घालून डोंगर चढणें कठिण जाईल, बूट वापरले पाहिजेत. त्यांच्या आग्रहामुळें आम्ही बूट विकत हि घेतले. पण ते पायाला चावले व फोड आले. नालवाडींतील ग्राम-सेवक बंधूंनीं बनविलेल्या चपलांनीं च यात्रेंत आम्हांला साथ दिला. सामान्यत: असें हि मानलें जातें कीं, हिमालयासारख्या कठिण यात्रेंत यात्रेकरूंच्या हातांत एक काठी व बरोबर एक कुली (ओझें वाहणारा) असणें फार च आवश्यक आहे. त्याशिवाय यात्रा करणें शक्य च नाहीं. पण आम्ही तर निश्चय च केला होता कीं, धैर्य हा च आमचा एकमात्र साथी व सहायक राहील. कवीनें म्हटलें आहे ना? "धैर्यं यस्य पिता."

० ० ०

## ३

## यात्रा-स्थानांतील अनुभव

प्रथम आमचा विचार फक्त बद्रीकेदारची यात्रा करण्याचा होता. पण हरिद्वारला गेल्यानंतर आम्ही पांच हि धाम करण्याचें ठरविलें. पांच जणींचे मिळून आमच्याजवळ २७० रुपये होते. इतक्या पैशांत पांच हि धामांची यात्रा करणें मात्र कठिण गेलें.

हरिद्वारहून हृषीकेश, देवप्रयाग, टिहरी, जम्नोत्री, गंगोत्री, गोमुख (गंगेचें उगमस्थान) उत्तर काशी, उरवीमठ, तुंगनाथ,

चमेली, जोशीमठ, विष्णुप्रयाग, बद्रीनारायण; पुन्हां चमेलीला परतून नंदप्रयाग, कर्ण प्रयाग, मेहलचोरी, द्वारहट, राणीखेत व शेंवटी नैनीताल अशी आमची यात्रा संपली. अर्थात् हीं यात्रेंतील मुख्य ठिकाणें आहेत.

परमेश्वराच्या कृपेनें, ताराबाईच्या आकस्मिक निधनाखेरीज दुसरी कोणती हि मानसिक आपत्ति आमच्यावर आली नाहीं. यात्रा सपवन दिल्लीस आलों तेव्हां एका मैत्रिणीला विषमज्वर झाला. पण श्री. देवदास गांधी, ठक्करबाप्पा, वियोगी हरि व कुमारी अमतुस सलाम यांच्या देखरेखीत ती हरिजन कॉलनींत राहिली व दोन महिन्यांनीं चांगली दुरुस्त झाली.

केदारनाथ व बद्रीनारायण येथील यात्रा विशेष कष्टदायक नाहीं. बहुतेक ठिकाणीं पाणी रस्त्यावर हि मिळतें दोन-तीन मैलांच्या अंतरावर 'चट्टी' (मुसाफरखानें) आहेत. चट्टीचा मुख्य भाग म्हणजे दुकान. त्यांत कणीक, तांदुळ, डाळ, तूप, इधन इत्यादि वस्तु मिळतात. ताजें दूध हि मिळतें. आम्ही गेलों तेव्हां दुधाचा भाव तीन ते चार आणे शेर होता. स्वयंपाकाची कामचलाऊ भांडीं हि मिळू शकतात. पण जे त्या दुकानांतून कांहीं ना कांही माल घेतील ते च त्यांच्या 'चट्टींत' राहूं शकतात. जसजसें वर जावें, तसतसें मालाचे भाव हि तिप्पट-चौपट वाढतात.

गंगोत्री-जमनोत्रीसारख्या हिमाच्छादित स्थानांचा मार्ग फार च कष्टमय आहे. त्या यात्रेंत अनेक प्रकारचे हाल होतात. कोठें कोठें १०-१२ मैलपर्यंत पाणी अजिबात मिळत नाहीं. परोपकारी धर्मात्म्यांनीं ज्या पाणपोया उघडल्या आहेत, तेथें च फक्त पाणी मिळतें. ह्या पाणपोया सामान्यत: पठारावर असतात. चट्टया हि फार दूर दूर आहेत. खाण्यापिण्याच्या वस्तु हि सर्व ठिकाणीं

मिळत नाहींत. थंडी फार असते. उंच सखल अशा दगडी व भयानक पायवाटा चढणें व उतरणें, नदीनाल्यांवरील दोरखंडांचे झुलते भीतिदायक पूल ओलांडणें, झऱ्यांचें पाणी पिणें, इत्यादि अनेक प्रकारचा त्रास ह्या मार्गानें होता. कित्येक ठिकाणीं तर जीवन-मरणाचा च प्रश्न डोळ्यांसमोर उभा राहतो. पूर्वीं ही यात्रा आजच्यापेक्षां हि कष्टदायी होती असें सांगतात. मोठ्या मुष्किलीनें, १०-१२ महिन्यांत ही यात्रा पुरी होत असे. आतां रस्ता सुलभ झाल्यामुळें २-३ महिन्यांत पूर्ण होते.

ह्या यात्रेंत कोठें कोठें आम्हांला चंवरी गाय पहावयास मिळाली. दिसायला आपल्या गायीसारखी असते. पण शरीरावर लांब लांब अस्वलासारखे केस असतात व शेपटी घोड्यासारखी असते. पाळीव जनावरांमधें गायींपेक्षां म्हशी जास्त प्रमाणांत दिसतात. येथें मेंढ्या, बकऱ्या तर पुष्कळ च पाळतात, पण दुधाकरतां नव्हे. त्या कदाचित् दूध देत च नसतील. कारण चारा कमी असतो. चाऱ्याचें दुर्भिक्ष सहज लक्षांत येतें.

चट्टीवर पोंचतां च दुकानदार 'यावें महाराज' म्हणून स्वागत करतो. पण दुकानांतून कांहीं सामान घेतलें नाहीं तर स्वत:जवळ बसूं हि देत नाहीं. विक्रीची आशा नाहीं हे पाहून तो फार त्रागा करतो.

ह्या डोंगराळ प्रदेशांत बटाटे, तुरी, हरबऱ्याचें पीठ, व उडदाची डाळ, ह्यां शिवाय दुसरें कोणतें च कालवण मिळत नाहीं. रस्त्यांत श्रीमंत धर्मात्म्यांचीं जीं अन्नछत्रें आहेत त्यांत फक्त साधु-संतांची च सोय होते. कित्येक श्रीमंत यात्रेकरू हि असहाय लोकांना व साधु-संतांना अन्नदान व वस्त्रदान देतात. डोंगरी मुलामुलींचें व स्त्रियांचें हि एक विचित्र दृश्य पहावयास मिळतें. यात्री दिसतां

च पै-पैसा, सुई धागा, बटवा, वगैरे वस्तु मागणारांचा एक घोळका जमा होतो. कांहीं न मिळालें तर शिव्या देतात. दुकानदारांचीं लहान लहान मुलें हि भीक मागतात. आई-बाप त्यांना हटकत नाहींत. ह्यांत कांहीं दोष आहे असें त्यांना वाटत च नाहीं. हें दृश्य पाहून आम्हांला दया येई व त्याबरोबर च वाईट हि वाटे. आम्ही त्यांना अशा रीतीनें भीक मागण्यांतील दोष समजावीत असूं. परंतु वंशपरंपरेनें चालत आलेल्या संस्काराविरुद्ध असलेला आमचा हा उपदेश कोण ऐकणार ? त्यांचें दारिद्रय व कष्टमय जीवन त्यांना हें सर्व करण्यास प्रवृत्त करतें. ही भीक मागण्याची वृत्ति आपल्या भरतखंडांतून केव्हां लोपेल तें देव च जाणे !

येथील डोंगराळ शेतांत गहूं, रामदाणा, ( चवळी सारखें एक धान्य ) व बटाटे ह्याशिवाय दुसरें कोणतें हि पीक होत नाहीं. सपाट जागा नसल्यामुळें ह्याखेरीज दुसरें कोणतें पीक क्वचित च होत असेल. पहाड तोडून जागोजागीं थोडी थोडी शेती केली जाते. शेतें पायऱ्याप्रमाणें दिसतात. एक शेत किती लांब रुंद असेल बरें ? १०-१२ फूट लांब व ३-४ फूट रुंद ! व तें हि सुरक्षित नसतें. शेतें गंगा नदीच्या कांठीं असल्यामुळें कधीं कधीं पुरानें सारें पीक नाहींसें होतें. गंगा-मातेची अवकृपा न झाली तरी दुसरीं संकटें असतात च. वावटळ, पावसाळ्यांत मोठमोठे दगड, गोटे, माती वगैरे वरून पडणें व त्यामुळें केवळ पिकाची च नव्हे तर शेताची हि नासाडी होणें, आदि आपत्ति हि केव्हां येतील ह्याचा नेम नाहीं. पुन्हां शेत दुरुस्त करायला श्रम हि बरे च पडतात. अशा प्रसंगीं शेतकऱ्यांच्या जीवनाची बहुधा धुळधाण होते. त्यांची अशी हृदयद्रावक स्थिति पाहून हिमत

खचते, डोळे भरून येतात. कधीं कधीं तर हे शेतकरी हि कोसळलेल्या कड्याच्या खालीं सापडू मृत्युमुखीं पडतात.

अशा बिकट परिस्थितींत हि त्या लोकांवर निसर्गाची फार कृपा आहे. एक तर हवा पाणी चांगलें आहे; शिवाय परिश्रमी असल्यामुळें ते इतके निरोगी व सुदृढ असतात कीं, पांच पांच मण ओझें पाठीवर घेऊन भराभर पहाड चढतात. सामान्यत: हे लोक सामान वाहण्याचें काम करतात. बटाटे, गहूं, डाळ, तांदुळ, तेल, गूळ, मीठ, कापड वगैरे माल स्वत: पाठीवरून किंवा खेचरांवर लादून बाहेरून आणतात. ह्या लोकांमुळें यात्रेकरूंची हि फार सोय होते. ह्यांचा पोषाख आदि पाहून सहृदय यात्रेकरूंचें हृदय भरून येतें. जुन्या फाटक्या कपड्यांचे लहान मोठे तुकडे जाड्या भरड्या दोऱ्यानें जोडून हे आपली लाज झांकतात. यात्रेकरू दिसतां च 'माई, बाबा, कुली करो' असें ओरडतात. यात्रेकरूनें कुली न केला तर त्यांना फार वाईट वाटतें. 'बाबांनो, तुमच्यासारख्या शेठ, सावकार लोकांनीं कुली न केला तर आम्ही जगूं कसे ? तुमची ही सहा महिन्यांची यात्रा च तर आमच्या जीवनाचा एक आधार आहे.' अशा प्रकारें दीनवाणीनें प्रार्थना करतात. हे लोक आपल्या पाठीवर केवळ सामान च नव्हे तर माणसें हि वाहतात. ही विषम परिस्थिति मीं आपल्या जीवनांत प्रथम येथें च पाहिली. परमेश्वर ही अमानुष विषम प्रथा केव्हां बंद करील कोण जाणे ! ह्या लोकांना तर ही प्रथा स्वाभाविक च वाटते.

हिवाळ्याच्या भर थंडींत देखील केवळ एक लंगोटी व सदरा वापरणारे हे लोक आपल्या पाठीवर केवळ दुसरा माणूस च नव्हे तर त्याचें सामान हि घेऊन जातांना जें दृश्य दिसतें तें

फार च विचित्र, करुणाजनक व गर्हणीय असतें. यात्रेस निघण्यापूर्वी पू. काकासाहेबांचा आशीर्वाद मागण्यासाठीं मी गेलें होतें, तेव्हां च ह्या दृश्याचें चित्र त्यांनीं माझ्यासमोर रेखाटलें होतें. पण त्यावेळीं मला नीट कल्पना आली नाहीं. आश्चर्यचकित मुद्रेनें मीं ते फक्त ऐकलें होतें. आतां तें दृश्य स्वतःच्या डोळयांनीं पाहिल्यानंतर व अनुभवल्यानंतर त्याचें करुणाजनक यथार्थ चित्र आज हि माझ्या डोळ्यासमोर उभें राहतें. परंतु दैवी कोपामुळें मी फार आजारी पडलें तेव्हां मला हि निरुपायास्तव अशा 'कुली'चा उपयोग करावा लागला. संदर्भानुसार पुढें त्याचें वर्णन करीन च.

वाचकांनीं अशी मात्र कल्पना करून घेऊं नये कीं, केवळ स्त्रिया च कंडीचा उपयोग करतात. पहाडी कुलींच्या पाठीवर कंडींत बसून आरामानें तीर्थ-यात्रा करणारे अनेक चांगले धष्टपुष्ट पुरुष हि ह्या यात्रेंत मीं पाहिलें. धनाची घमेंड व स्वतःची मानसिक दुर्बलता, अशा दोन कारणांमुळें हे मानवरूपी पाषाण निर्दयपणें त्या कुलींच्या पाठीवर बसतात व मुक्कामाच्या ठिकाणीं त्यांच्याकडून कपडे धुणें, मालीश करणें, लाकडे आणणें वगैरे इतर कामें हि करून घेतात. जिवंत यात्रेकरू व त्यांचें निर्जीव सामान दोन्ही हि पाठीवर लादून कुंडीवाला वाहून नेतो. तेव्हां तीर्थयात्रेची भावना किती पतित होते हा विचार मनांत येतां च हृदयांत धडकी भरते. कंडीवाल्याच्या धापा ऐकून अंतःकरण द्रवतें. सहृदय यात्रेकरू त्यांची ही व्यथा पाहूं शकत नाहीं. हें दृश्य पाषाण-हृदयाला हि पाझर फोडतें.

कोणीकडे आमची ती प्राचीन संस्कृति व कोणीकडे आमचें हें आधुनिक अधःपतन ! पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावामुळें आमची वृत्ति कृत्रिम बनली आहे. आमचे उच्च आचार-विचार,

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत
२८१६३ वि: ........
नों. दि: ........

राहणी, आत्मशक्ति, आत्मिक बल वगैरे सर्व च बदलले आहे. आमचा आत्मा धन दौलतीचा दास बनला आहे. आमच्या आचाराची व विवेकाची फारकत झाली आहे. कपट व दंभ वाढले आहेत. आमच्या शिक्षणांत 'आत्मा' व 'हृदय' यांना स्थान च उरलें नाहीं. विवेक सुटल्यामुळें आम्ही असें समजतो कीं, तीर्थ-यात्रा केल्यानें स्वर्ग-प्राप्ति होते. हा विचार अगदीं च भ्रामक आहे. येथें मला एक जुनी कहाणी आठवते. ती बहुधा संत तुकाराम महाराजासंबंधीं आहे. ती कथा अशी आहे.

एकदां पुष्कळसे साधु यात्रेस निघाले. त्यांनीं संत तुकारामांना हि बरोबर येण्याबद्दल फार आग्रह केला. त्यांना नाहीं म्हणणें महाराजांना शक्य नव्हतें. त्यांनीं एक भोपळा त्या साधूंना दिला व म्हणाले, 'मला तर सध्यां सवड नाहीं; माझा प्रतिनिधि म्हणून हा भोपळा तुम्ही बरोबर न्या. ज्या ज्या तीर्थांत तुम्ही स्नान कराल तेथें तेथें विधिपूर्वक त्याला हि स्नान घाला. परत येतांना हा भोपळा हि बरोबर आणा. असे केल्यानें तुम्हांला ज्ञान-प्राप्ति होईल.'

साधु लोक प्रत्येक तीर्थाच्या ठिकाणीं त्या भोपळ्याला स्नान घालीत. अशा प्रकारें अनंत तीर्थ-स्नानांची यात्रा करून ते परत आले व तो भोपळा त्यांनीं तुकाराम महाराजांसमोर ठेवला. तेव्हां मोठ्या समारंभपूर्वक त्याची पूजा वगैरे करून महाराजांनीं त्याच्या फोडी केल्या व सर्वांना वाटल्या. तो प्रसाद तोंडांत टाकतां च सर्वांचीं तोंडें कडू झालीं. तें पाहून महाराज स्मित करून म्हणाले, "हा भोपळा अजून हि कसा कडू राहूं शकतो ? शेंकडो तीर्थांचें स्नान व देवतांचें दर्शन करून हि ह्यांत कांहीं च फरक पडला नाहीं ? त्याचा ह्यावर कांहीं च परिणाम झाला नाहीं ?"

आमची हि अशी च स्थिति आहे. यात्रेमुळें अंत:करण शुद्ध न होतां पूर्वीं होतें तसें च नंतर हि राहतें. आमची यात्रा अंतरात्म्याची नसते: आमचे सर्व व्यवहार यंत्रवत् होतात.

माझ्या वरील लिखाणाचें तात्पर्य कोणा हि यात्रेकरूनें कोणत्या हि परिस्थितींत कुलीची मदत घेऊं नये असें नाही. मला इतकें च सुचवावयाचें आहे कीं यात्रेकरू अचानक आजारी पडला तर अशा वेळीं च 'कंडी' वापरणें क्षम्य समजावें. सामान्यत: एक सहायक म्हणून कुलीचा प्रवाशांना पुष्कळ उपयोग होतो. त्यांना डोंगरांतील वर खाली जाणारे सर्व रस्ते माहीत असतात. अडचणीचे वेळीं ते यात्रेकरूंना योग्य मार्गदर्शन करतात. आहार-विहारांतील अनियमितपणामुळें यात्रेकरू आजारी पडला तर हे च त्याची सेवा शुश्रूषा करतात.

० ० ०

## ४

## हिमगिरीचें प्राकृतिक दृश्य

हिमालय पर्वतावर पाय ठेवतां च नाना प्रकारचीं प्राकृतिक दृश्यें डोळयासमोर नाचूं लागतात. परमेश्वराचीं रूपें अगणित आहेत. त्यांचें वर्णन सरस्वतीला हि अशक्य तेथें मानवाची कथा काय ? हीं रूपें अवर्णनीय आहेत. ह्यांच्या दर्शनानें ज्या प्रमाणें डोळे मुग्ध होतात त्या च प्रमाणें मन हि आश्चर्यचकित व स्तंभित होतें. डोंगरावरील प्रवासामुळें आलेला सर्व थकवा, झालेले सर्व कष्ट, लागलेली तहान-भूक, सर्व कांहीं हीं मनो-

वेधक ईश्वरी रूपें पाहतां च मनुष्य विसरतो; व मन त्यांत च दंग होतें.

अधिक काय सांगू ? कोठें कोठें तर हें दृश्य इतकें मोहित करतें कीं मानवी मन आनंद-सागरांत पोहूं लागतें; व शरीराचें भान च राहत नाहीं. 'मन मस्त हुआ तब क्यों बोले' अशी अवस्था होते. त्यावेळचे भाव, विचार-तन्मयता ,पवित्रता, व त्या पावन तीर्थ-क्षेत्रांचें पुण्यमय वातावरण आतां माझ्या नजरेसमोर नाहीं. मी कवयित्री असतें तर त्या दृश्यांचा मनमोहक, अलौकिक काव्यमय रस मीं आपल्या हृदय-कुंभांत सांठवून ठेवला असता, व थेंब थेंब सर्वांना वाटला असता. जर सर्वसामान्य लेखिका असते तर अक्षररूपी मोत्यांच्या रूपांत तीं कागदावर पसरलीं असती. साधारण चित्रकार असतें तर स्वत:च्या चित्तांत त्यांचें चित्र काढून विचाररूपी तरंगांत मी तरंगलें असतें. पण माझ्यांत अशी कोणती च कला नाहीं. तरी देखील यथाशक्ति त्यांचे वर्णन करण्याचा प्रयत्न मी करीत आहें.

ज्यांनीं तीं दृश्यें प्रत्यक्ष पाहिलीं नाहींत त्यांना त्यांची पूर्ण कल्पना येणें शक्य नाहीं. स्वच्छ, शुभ्र हिमाच्छादित उंच च उंच, टोंकदार पर्वतांची गगनचुंबी तीन शृंगें दृष्टीस पडतां च, उंच आकाशांत ब्रह्मा, विष्णु, महेश ह्या त्रिमूर्ति च जणू एकत्र आल्या आहेत असें भासतें. महान पर्वतांचें तें विशाल दृश्य पाहून असें वाटूं लागे कीं, जणू कांहीं भगवान विराट रूप धारण करून, भरतखंडांतील महा विभूती महात्मा गांधींच्या प्रमाणें, स्वत: कांतलेल्या सुताची शुभ्र चादर पांघरून, भरतखंड स्वतंत्र कसा होईल ह्या संबंधीं विचार करण्यांत मग्न आहेत. हिमालयाचीं असंख्य शिखरें विराट पुरुषाच्या अगणित शिरा-

सारखीं भासतात. हें दृश्य पाहून गीतेंतील खालील श्लोकाची आठवण होते.

नान्तं न मध्यं न पुनस्तवादीं पश्यामि... गीता ११:१६

बर्फाच्छादित, स्वछ, सूर्यकिरणांमुळें स्फटिकासारख्या, चकाकणाऱ्या उज्ज्वल शिखरापर्यंत पोंचणें फार कठिण आहे. पण गोमुख, बद्रिनारायण, व केदारनाथवरून हीं दृश्यें अगदीं जवळून चांगल्या प्रकारें पाहतां येतात.

प्रकृति-मातेची चित्रकला देखील प्रेक्षणीय आहे. पर्वताच्या चारी बाजूला असलेल्या चित्रविचित्र छटा पाहून असें वाटतें कीं, चित्रकला-विशारद साक्षात् विश्वकर्म्यानें स्वत:च्या कुंचल्यानें च अनेक वर्षे काम करून हें चित्र रंगविलें आहे. जिकडे तिकडे रंगी-बेरंगी वेलबुट्टया, बाहुल्या, चिमण्या, व अनेक प्रकारचीं खेळणीं ठेवून व्यवस्थितपणें साजसजावट केली आहे असें भासतें. जिकडे पहावें तिकडे दृष्टि खिळून जाते. सकाळ-सायंकाळची संधि-छटा तर विशेष च सुदर असते. प्रात:काळीं उषादेवी आपला लाल गुलाल जगभर उधळते व त्यामुळें सर्व जग लाल च लाल दिसतें. सूर्योदयाचें वेळीं तर किरणें स्वच्छ बर्फावर पडतां च तो अनेक रंग धारण करतो व प्रेक्षकांचीं मनें मोहून टाकतो. अशा वेळीं आनंदाच्या लहरी उठनात. डौलदार शिखरें गगनचुबी भासतात. पहाडांमधील दऱ्यांत धुक्याचे ढग इतके दाट असतात कीं, सूर्योदयानंतर कित्येक तास पहाड दिसत च नाहींत. पांढरे ढग जमिनीपासून आभाळापर्यंत पसरलेले असतात व त्यांमुळें पृथ्वी व आकाश यांमधील अंतर लक्षांत च येत नाही. केव्हां केव्हां तर असें वाटतें कीं, जणू आकाश च ठेंगणें झालें आहे.

शिखरांवरील पांढरा बर्फ जेथें संपतो तेथून दाट वनराजींचा देखावा सुरू होतो. देवदार आणि चीड यांच्या सरळ व गगनचुंबी वृक्षांची अपूर्व शोभा मन वेधून घेते. देवदारचे वृक्ष व्यवस्थित क्रमानुसार एकावर एक असलेल्या फांद्यांमुळें सात मजली घरांप्रमाणें भासतात. हे वृक्ष इतके घनदाट असतात कीं त्यांची छाया पाहून च थकलेल्या प्रवाशाचें मन प्रसन्न होतें. कोणी त्या छायेखालीं बसतो, कोणी लोळतो, थोडें खाऊन पाणी पितो, तर कोणी आनंदाच्या भरांत मोठमोठ्यानें गाणीं गातो. अशा प्रकारें निसर्ग-देवतेचें हें अपार विस्तृत सौंदर्य पाहून सर्वांच्या कष्टांचें परिमार्जन होतें. एकदां विश्रांतीसाठीं छायेचा आश्रय घेतला कीं दहा पांच मिनिटें तर सहज च निघून जातात व नंतर यात्रेची आठवण होतां च आकर्षक देखावे पुन्हां एक वेळ पाहून, परमेश्वराचें गुण-गान करीत हळू हळू यात्रेकरू पुढें चालूं लागतो. पानांच्या निळ्या पिवळ्या रंगांमुळें ह्या वृक्षांची अपूर्व शोभा अधिक च खुलून दिसते. ह्यांचे सरळ बुंधे, सरळ फांद्या व सुरू वृक्षाचे नोकदार शेंडे विशेष च सुंदर दिसतात. शेकडो प्रकारची फळझाडें, फुलझाडें, व लता वेलीं यांचीं अनेक दाट जंगलें येथें आहेत. त्यांचा सुगंध सर्व आसमंतांत दरवळत असतो.

ह्या पर्वतावर कांहीं कांहीं ठिकाणीं इतकी सुंदर हिरवळ असते कीं, पर्वतराजानें जणूं हिरवा मखमलीचा पोषाख चढवला आहे, असें भासतें. फुलापानांनीं नटलेल्या छोटेखानी रोपट्यांची ती शोभा फार मनमोहक दिसते. चौफेर पसरलेल्या पर्वतांचें हें दृश्य अवर्णनीय आहे. काळया ढगांची छाया ह्या पर्वतांवर पडते तेव्हां काळ्या बुट्ट्यांचा हिरवा शालू च त्यांनीं पांघरला आहे असें वाटतें. ह्या ढगांमधून सूर्यकिरणें बर्फावर पडून प्रतिबिंबित

होतात तेव्हांचें दृश्य तर अनुपमेय च असतें. पाऊस थांबल्यानंतर पर्वताच्या खडकाळ कडयांवरून वर जाणाऱ्या वाफांचें चित्र हि विशेष च असतें. त्या वेळीं असा भास होतो कीं, जणूं कांहीं पृथ्वी थकून भागून धापा टाकीत आहे.

जंगलांतील वृक्षांवर पसरलेल्या निरनिराळया वेलींच्या रंगी-बेरंगी व विविध आकारांच्या फुलांमुळें वनराजींचें सौंदर्य दसपट वाढतें. त्याचें वर्णन शब्दांत पूर्णपणें करणें च शक्य नाहीं. या अलभ्य लाभामुळें पं. अयोध्यासिंह उपाध्यायरचित खालील हिंदी काव्याची मला आठवण होते.

"अनूठी आभा से, सरस सुषमा से, सुरस से ।
बना जो देती है, बहु गुणमयी, भू विपिन की ।।
निराले फूलों की, विविध दलवाली अनुपमा ।
जडी बूटी नाना फलवती है विलसती ।।

ह्या कंदमूळांची नीट माहिती असलेले व केवळ त्यां वर च स्वतःचा उदरनिर्वाह करणारे कांहीं तपस्वी हि येथें आहेत. तीर्थयात्रेच्या उद्देशानें येणाऱ्या यात्रेकरूंत मात्र ह्या कंद मूळांचा तज्ञ बहुधा नसतो. असा कोणी यात्रेकरू आला तर त्याला बरा च लाभ होऊं शकेल.

हिमालयावर पाय ठेवतां च त्यावरील वनस्पति, औषधोप-योगी झाडे-झुडपें व जीवनदायी हवा यामुळें यात्रेकरूचा सर्व शारीरिक थकवा व सुस्ती नाहींशी होते; व अपूर्व उल्हास वाटतो. रक्त दूषित असल्यास शुद्ध होतें, भूक वाढते, शरीर निरोगी होतें. डोंगरावरील चढण्याउतरण्यामुळें शारीरिक शक्ति वाढते, व त्याबरोबर च मानसिक शक्ति हि.

हिमालयावरील झऱ्यांचें दृश्य हि विशेष च असतें. पृथ्वीच्या पोटांतून बुडबुड निघणारें पाणी अधिक लाभदायी असतें, असें मानतात.

येथील यात्रेकरूंसाठीं गंगेचें पाणी वर्ज्य मानलें जातें. ह्या झऱ्यांचें पाणी फार जोरानें उसळत, खळखळत, धावत, वाहतें. कड्यावरून फार जोरानें खाली पडणारे व उडणाऱ्या तुषारांनीं आसपासच्या जमिनीचें सिंचन करणारे निर्झर आपल्या कलकल निनादानें प्रवाशांना त्यांची तहान भागविण्यासाठीं जणू निमंत्रण देत असतात, व त्यांचा थकवा दूर करतात. परमेश्वराच्या ह्या सुंदर विभूतींचें वर्णन काय करणार? ह्यांचें सारे जीवन च परोपकारार्थ असतें. परोपकाराचा धडा लोकांना स्वतःच्या उदाहरणानें ते सारखे शिकवीत असतात.

ह्या अडचणीच्या व कष्टप्रद मार्गात प्रकृति-मातेनें आणखी हि एक उपकारक व्यवस्था केली आहे. ती म्हणजे कांहीं ठिकाणीं गरम पाण्याच्या झऱ्यांची सोय. अशा झऱ्यांच्या ठिकाणीं लोकांनीं स्नानासाठीं कुंडें बांधलीं आहेत. तेथें स्नान केल्यानें सर्व थकवा जातो. ह्या झऱ्यांच्या निमित्तानें दयाळु निसर्गदेवता आपल्या प्रवाहरूपी लांब लांब हातांत कढत तापलेलें पाणी घेऊन 'या, या, ह्या दगडावर बसा, गरम पाण्याचें स्नान करा, व आपला सर्व थकवा घालवा,' अशा प्रकारें सर्वांचें जणूं स्वागत करते आहे असा भास होतो. निसर्ग-देवता अनंत प्रकारें आदर-सत्कार करून यात्रेकरूंना खुष करत असते. त्यांना आनंद-साम्राज्याच्या गादीवर बसवून आनंदोत्सव साजरा करते. स्वच्छंदपणें तास न् तास स्नान करणें, मळलेले कपडे धुणें, वगैरे अशा कुंडांच्या ठिकाणीं च शक्य असतें. अन्य ठिकाणीं बर्फामुळें नदीनाल्यांचें पाणी फार थंड असतें,

त्यामुळें त्यांत स्नान करणें कठिण असते. थंडीमळें यात्रेकरूंपैकी फार च थोडे लोक रोज स्नान करीत असतील. त्यामुळें असा गरम झरा मिळतां च यात्रेकरूंना अपार आनंद होतो. कांहीं ठिकाणीं तर पाणी इतकें कढत असतें कीं यात्रेकरू डाळ, तांदूळ, बटाटे वगैरे वस्तु कपडयांत बांधून शिजण्यासाठीं या झऱ्यांत टाकतात व शिजल्यानंतर बाहेर काढून आनंदानें जेवतात. ह्या उकळणाऱ्या पाण्यांत पोळी सोडली तर ती थोडया वेळानें चांगली शिजून वर येते. चुलीची, चिमटयाची, गरज नाहीं; व विस्तव पेटविण्याचा त्रास नाहीं.

सृष्टि पंचमहाभूतात्मक आहे. हीं पंचमहाभूतें केव्हां केव्हां आपल्या क्रिया अशा प्रकारें करतात कीं, त्या पाहून आपण आश्चर्य चकित होतों. गंधकांत अग्नि असतो, असें मानलें जातें. जेथें जेथें गंधकांचें पहाड असतात तेथें तेथें उकळतें पाणी मिळतें. ह्या पाण्यानें चर्मरोग नाहींसे होतात. ईश्वरी माया किती मोहक व आश्चर्यजनक आहे ! त्यांत कोणकोणती शक्ति भरली आहे कोण जाणे !

आतां शेंवटीं गंगाजीसंबंधीं. हिमालयांतून पुष्कळशा नद्या निघतात. पण त्या सर्वांत गंगा व यमुना या च मुख्य आहेत. ह्या दोघींचें रंग, रूप, उगम-स्थान सर्व कांहीं भिन्न आहे. गंगेचा रंग पांढरा व थोडासा धूसर आहे. तिच्या पाण्यांत वाळूचे बरे च कण असतात. प्रवाहाला ओढ असते; व प्रवाहाच्या जोरदार आवाजा मुळें आकाश दणाणून जातें. गंगेचें रूप निरनिराळ्या ठिकाणीं बदलतें. कुठें गंभीर, कुठें शांत, कुठें गुप्त, कुठें प्रकट तर कुठें समुद्राला मिळण्याच्या उत्कट उत्सुकतेमुळें अत्यंत वेगवान झालेलें दिसतें. कांहीं कांहीं ठिकाणीं गांवाजवळील घाटावर बसलेल्या यात्रेकरूंना

आपल्या तुषारांनीं न्हाऊं घालून त्यांच्या रुचीनुसार आनंदित किंवा शांत-चित्त बनविते.

गंगोत्री हें गंगेचें उगमस्थान आहे असें लोक मानतात. पण ही कल्पना चुकीची आहे. खरें उगम-स्थान गंगोत्रीहून १८ मैलांवर 'गोमुखधारा' हें आहे. त्या ठिकाणीं एका रुंद गुहेंतून गंगा निघते. गंगेच्या जोरदार प्रवाहांत वर्फाचे मोठे मोठे तुकडे हि वाहतात. ह्या उगमस्थानीं जाणें फार कठिण आहे. मोठ्या कष्टानें एखादा त्या ठिकाणीं जाऊं शकतो. बर्फाच्या तुकड्यामुळें गंगेचा उगम तेथें स्पष्ट दिसतो. तेथील दृश्य अद्भुत व प्रेक्षणीय आहे. त्याचें वर्णन संदर्भानुसार पुढें येईल च.

सूर्याच्या उष्णतेमुळें बर्फ वितळतें तेव्हां गंगेला पूर येतो. बहुधा हा पूर उन्हाळ्यांत च येतो.

आर्य संस्कृतीचा जन्म उत्तर भारतांत झाला. ह्या उत्तर भारताला गंगा नदीनें जलसिंचन करून बलवान, चैतन्यवान व साहसी बनविलें. त्यामुळें हिंदु लोक गंगा नदीला साहजिक च पूज्य मानतात. आर्य संस्कृतीचा सांभाळ व वाढ देखील गंगा नदीच्या आसमंतांत च झाली. येथील हवापाण्यामुळें केवळ शरीर च नव्हे तर मन व बुद्धि देखील पवित्र व चैतन्ययुक्त बनते. म्हणून च पूर्वीपासून आजपर्यंत मोठ मोठे महात्मे व तपस्वी लोक येथें आले व तपश्चर्यापूर्वक ज्ञान मिळवून स्वतःचा च नव्हे तर साऱ्या जगाचा त्यांनीं उद्धार केला येथें राहिल्यानें कुवासना लोपतात व ईश्वराची लय लागते. अशा शुभ ठिकाणीं जर सत्संग लाभला तर मग काय विचारावे ? दुधांत साखर पडली किंवा सोनें च सुगंधित झालें ! स्मृतिकार व श्रृतिकार हि गंगा मातेच्या

पुण्यप्रभावाचा उल्लेख अत्यंत आदरपूर्वक करतात. गीतेंत भगवान् श्रीकृष्ण म्हणतात,

"स्त्रोतसामस्मि जाह्नवी"—"नदी गंगा नद्यांत मी."

अशा परम पवित्र गंगामातेचें आनंददायी सौंदर्य व अनंत पर्वतांची विशाल शोभा पाहून मला 'प्रिय प्रवासाचें' खालील हिंदी पद आठवतें.

"इच्छा होती है स्वजनों को फिर एक बार वन ले जाऊं।
और वहां की अनुपम महिमा उन्हें घुमाकर दिखलाऊं॥

आतांपर्यंत यात्रेंतील निसर्ग-सौंदर्य व सर्वसामान्य अनुभवांचें वर्णन झालें. प्रत्येक स्थानाचें व विशेष घटनांचें वर्णन ह्या पुढील विभागांत क्रमाक्रमानें दिलें जाईल.

० ० ०

## ५

## यात्रा-स्थानें

### हरिद्वार

आमच्या यात्रेची सुरवात हरिद्वारपासून झाली. हरिद्वारला साऱ्या भारतांतील विद्यार्थ्यांसाठीं 'गुरुकुल कांगडी' नांवाची एक आदर्श संस्था आहे. येथें ब्रह्मचारी विद्यार्थ्यांना सर्व जीवनोपयोगी विद्या शिकविल्या जातात. ह्या संस्थेंत शिकलेले विद्यार्थी-स्नातक बहुधा देशसेवेच्या कार्यांत पुढाकार घेतात. ह्या संस्थेचें पवित्र वातावरण पुष्कळसें साधें व सत्यनिष्ठ आहे. अनेक आध्यात्मिक

ग्रं. क्र. ८८-८४

व्यक्ति येथें राहतात. ह्या संस्थेसंबंधी अधिक लिहिण्याची आव-श्यकता नाहीं, कारण एक तर तो माझा विषय नाहीं व दुसरें असें कीं बहुधा सर्व सुशिक्षित लोकांना ह्या संस्थेची माहिती आहे. ह्या गुरुकुलखेरीज अशा च प्रकारच्या इतर हि अनेक संस्था हरिद्वारला आहेत.

ह्या गुरुकुलमध्यें श्री. सत्यदेवजींचे बंधु श्री. बलदेवजी व्यायाम शिक्षक आहेत. त्यांच्या घरीं आम्ही उतरलों. व सायंकाळीं गुरुकुलच्या दीडशें ब्रह्मचाऱ्यांबरोबर जेवलों. ह्या सुंदर वाता-वरणामुळें आमचें मन फार प्रसन्न झालें.

सायंकाळीं सहज फिरत फिरत आम्ही 'हरकी पौडी' पर्यंत गेलों. ब्रह्मकुंड हें येथील मुख्य तीर्थ. ह्या कुंडाचा घाट चारी बाजूनीं पक्का बांधलेला आहे. येथें यात्रेकरू विधिपूर्वक स्नान, तर्पण आदि करतात. घाटावर गंगाजी, गायत्री, लक्ष्मीनारायण, इत्यादि मंदिरें आहेत. स्थान रमणीय व आरोग्यदायी आहे. लोकसंख्या बरी च आहे. बाजार साधारण मोठा आहे. गंगेच्या कालव्यामुळें स्थानाला भौगोलिक महत्त्व लाभलें आहे. येथील प्राकृतिक छटा मनमोहक आहे. वदंता अशी आहे कीं, स्वर्गारोहणाचे वेळीं पांडव हरिद्वारला कांहीं दिवस राहिले होते.

**कनखल**

हरिद्वारहून दोन मैलांवर कनखल आहे. येथें हि साधारण बाजार आहे. कनखलला जातांना गंगाजीचा पूल ओलांडावा लागतो. येथें अनेक मंदिरें हि आहेत. सतीकुंड हि येथें च आहे. वडिलांनीं तिरस्कृत केल्यामुळें रागावून सती दक्षपुत्रीनें ह्या कुंडांत च अग्निकाष्ठ भक्षण करून आपला देह सोडला होता. कनखलला यात्रेकरूंना थांबण्यासाठीं पुरेशा धर्मशाळा आहेत.

हरिद्वार व कनखल एक दिवसांत आटोपून दुसऱ्या दिवशीं ता. ६-५-३५ रोजीं सकाळीं ७॥ वाजतां आम्ही हृषीकेशला जाण्यासाठीं निघालों. तेथें पोंचतां च पूज्य श्री. काकासाहेब कालेलकर यांच्या चिठ्ठीच्या आधारें श्री. नीलशास्त्री यांनीं दिलेलें पत्र आम्हीं बाबा कालीकमलीवाले यांना दिलें. बाबाजींनीं आमच्या राहण्याची व भावी हिमालय-यात्रेसंबंधीं बरी च सोय करून दिली; ह्याबद्दल आम्ही त्यांच्या आभारी आहोंत.

हरिद्वारहून हृषीकेश सोळा मैल आहे. मोटारनें किंवा रेल्वेनें हि जातां येतें. आम्ही तर पायीं यात्रा करण्यासाठीं निघालों होतों. म्हणून हरिद्वारहून निघून भीमगोड्यानंतरच्या सत्यनारायण मंदिराच्या धर्मशाळेंत आम्हीं थोडी विश्रांति घेतली. येथें बाबा कालीकमलीवाले यांचें एक औषधालय हि आहे. येथें एक पाणचक्की हि लावली आहे. त्यावर दळणाचें काम होतें. १५-२० मिनिटें फराळ वगैरे केल्यानंतर एक रिकामी मोटार मिळाली तींत बसून ४५ मिनिटांत आम्ही हृषीकेशला पोंचलों.

### हृषीकेश

हें गांव गंगेच्या कांठाकांठानें वसलें आहे. गंगास्नान व भरत-मंदिराचें दर्शन हा च येथील यात्रेचा मुख्य उद्देश मानला जातो. येथें गंगेचें पाणी अगदीं शुद्ध आहे. बाबा कालीकमली-वाले यांचें मुख्य कार्यालय येथें च आहे. त्यांच्यातर्फे येथें एक औषधालय व शाळा चालते. संन्याशांना फुकट भोजन मिळतें. बाबाजींच्या संस्थेतर्फे लक्ष्मण झूला, महादेव सेन, व्यासघाट, देवप्रयाग, श्रीनगर, रुद्रप्रयाग, गुप्त काशी, त्रियुगी नारायण, गौरीकुंड, रामबाडा, केदारनाथ, ऊखीमठ, तुंगनाथ, चमोली, जोशीमठ, बद्रीनाथ, जमनोत्री, उत्तर काशी, गंगोत्री, इत्यादि

प्राय: सर्व च ठिकाणीं धर्मशाळा व अन्न-छत्रें आहेत. ज्या श्रीमंत व धर्मात्मा शेटसावकारांमार्फत येथील धर्मशाळांतून अन्न-छत्रें चालू आहेत त्यांची व्यवस्था हि बाबा कालीकमलीवाले यांचेकडे च आहे. व बाबांच्या चिट्ठीनें च त्या सदावर्तांतून कणीक, तांदूळ, डाळ, मीठ, तूप, तिखट वगैरे शिधा-सामुग्री मिळते. सामान्यत: अशी चिट्ठी साधु व गरीब यात्रेकरू यांना च मिळते. ही चिट्ठी दाखविली म्हणजे त्यांच्या प्रत्येक धर्मशाळेंत ठराविक शिधा मिळतो. वाटखर्चासाठीं रुपये नसतील तर केव्हां केव्हां उधार रकम हि मिळते. ह्या संस्थेला अनेक धर्मात्मे दान देत असतात.

हृषीकेशच्या धर्मशाळेची व्यवस्था फार चांगली आहे. यात्रेकरूंची येथें नेहमीं गर्दी असते. येथें च थांबण्याच्या कल्पनेनें आम्ही गेलों. चांगली व्यवस्था पाहून आम्ही फार प्रसन्न झालों. यात्रेकरू पोंचतां च उतरण्याची व्यवस्था करण्यासाठीं कर्मचारी तत्पर असतात. न मागतां आंथरूण पांघरूण, पाणी वगैरे ताबडतोब आणून देतात. संध्याकाळीं अंधार पडतां च दिवा आणून ठेवतात. साधु-संतांना त्यांच्या इच्छेनुसार डाळ, भात, पोळी, भाजी, किंवा शिधा दिला जातो. आजारी पडल्यास यात्रेकरूंना फुकट औषध दिलें जातें. बाबाजींच्या धर्मशाळेखेरीज इतर हि अनेक धर्मशाळा व अन्न-छत्रें येथें आहेत.

बाबाजींच्या धर्मशाळेंत आमचें फार च आदरातिथ्य झालें. भोजनानंतर आम्ही बाबाजींकडे गेलों. थोडा वेळ बोलणें झालें. आमच्या बरोबरच्या इंग्रज भगिनी–ताराबाई–यांना पाहून प्रत्येकाला आश्चर्य वाटे. बाबाजींनीं हि विचारलें 'इंग्रज भगिनीबरोबर भोजन वगैरे करणें तुम्हांला आवडतें ?' आम्हीं लगे च

उत्तर दिलें, 'होय, आध्यात्मिक दृष्टीनें हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती आदि भेद मानणें बरोबर नाहीं. जो आत्मा हिंदूंच्या हृदय-मंदिरांत निवास करतो तो च मुसलमानांच्या व ख्रिस्ती लोकांच्या हृदयांत निवास करतो. लोक ही आध्यात्मिक एकता विसरतात व संकुचित दृष्टीनें विचार करतात. मुसलमानांचे किंवा ख्रिस्ती लोकांचें आचार विचार पवित्र असतील तर त्यांच्याशीं समतेचा व्यवहार करण्यास संकोच कां वाटावा ? ह्या भगिनीचे आचार-विचार आमच्यापेक्षां कमदर्जांचे नाहींत. म्हणून यांच्या बरोबर खाण्यापिण्यांत कांहीं दोष नाहीं असें आम्हांला वाटतें.' आमचें हें उत्तर ऐकून बाबाजी प्रसन्न झाले थोड्या वेळानें त्यांनीं विचारलें 'आतां तुम्ही माझ्याकडून काय अपेक्षा राखतां ?' आम्हीं म्हटलें 'यात्रेची तुम्ही कांहीं व्यवस्था करू शकलां तर आपली फार कृपा होईल.' बाबाजींनीं विचारलें 'तुम्ही अन्न-छत्रांत (फुकट) भोजन करूं इच्छितां का ?' आम्हांला संकोच वाटतो आहे असें पाहून ताराबाई एकदम म्हणाल्या 'होय, होय आम्ही तें च इच्छितों' बाबाजींनीं चिट्ठी देण्याबद्दल इषारा केला. ही चिट्ठी––जिच्या आधारें सर्व मुक्कामांवर शिधा मिळतो–– हृषीकेशहून तीन मैल असलेल्या 'लक्ष्मण झूला' ह्या ठिकाणीं मिळते. म्हणून आम्हीं हि लक्ष्मण झूल्याला जाण्याची तयारी केली.

**लक्ष्मण झूला**

दुसऱ्या दिवशीं आम्हीं लक्ष्मण झूल्याला जाण्यासाठीं निघालों. पाय-रस्ता सोडून आम्ही सडके सडकेनें बरें च पुढें गेलों. इतर यात्रेकरूंना विचारलें तेव्हां कळलें कीं लक्ष्मण-झूला सहा मैल मागें राहिला ! तेव्हां आम्हां पाचजणीं पैकीं दोघी-जणी परत गेल्या; व चिट्ठी घेऊन आल्या. त्या येईपर्यंत १२

वाजून गेले. आम्ही स्नान वगैरे करून व थोडा चुरमा खाऊन पाणी प्यालों व जवळ च एका झाडाखालीं लवंडलों. माझ्या-खेरीज इतर चौघींना झोप हि लागली.

इतक्यांत एक मनुष्य धांवत आला व मला रस्त्याच्या बाजूस बसलेली पाहून म्हणाला, 'माताजी! तुमच्या जवळ कांहीं औषध आहे काय? जखमेवर लावण्यासाठीं पाहिजे आहे देवप्रयागहून येणारी मोटार खड्ड्यांत पडल्यामुळें माझ्या डोक्याला फार मोठी खोक पडली आहे, इतर हि दोघे तिघे जखमी होऊन पडले आहेत. मीं त्याला बसण्यास सांगितलें व जखम पुसून अमृतांजन लावलें. जखमी होऊन पडलेल्या लोकां-कडे जाण्याची हि इच्छा झाली. पण चौकशीअंतीं कळलें कीं ते एक मैल दूर आहेत. थकलें असल्यामुळें इतक्या दूर जाण्याची हिंमत झाली नाहीं. थोड्या वेळानें दुसरा एक मनुष्य त्या जखमी लोकांना पाणी पाजण्यासाठीं भांडें मागण्यास आला. मी झटपट उठून पाणी आणण्यासाठीं धावत गेलें. मला पाहून दुसरी एक भगिनी धावत आली. आम्ही पोंचण्यापूर्वी च तेथें दुसरी एक मोटार पोंचली होती. व त्या मोटारींतील १०-१२ जण, जखमी लोकांना पाहण्यासाठीं आले होते. त्यांनीं जखमी लोकांना खड्ड्यांतून उचलून सडकेवर आणलें होतें. जखमी झालेल्यांपैकीं एकाला आम्ही पाणी पाजल्यानंतर त्याला वांती होऊन त्याचे कपडे भरले. त्यावेळीं सर्व यात्रेकरू उभे राहून गम्मत पाहत होते. त्या वांती झालेल्या माणसाला स्पर्श करण्यास हि कोणी तयार नव्हते. माझें मन हि त्याला स्पर्श करण्यास कांकू करीत होतें. ह्या मानसिक दुर्बलतेबद्दल वाईट हि वाटत होतें. शेंवटीं स्वतःच्या मनाचा धिःकार करून त्या

माणसाला मीं स्वच्छ केलें. त्यानंतर मी परत येत असतां तमाशा पाहणाऱ्या त्या यात्रेकरूंनीं मला थांवविलें व आग्रहपूर्वक आम्हा दोघींना हि मोटारींत बसवून इतर तिघी जणी थांबल्या होत्या तेथपर्यंत पोंचविलें. आम्हांला पायवाटेनें जायचें होतें; म्हणून त्या च मोटारींत बसून आम्ही परत लक्ष्मण झूल्यास आलों. सायंकाळीं ६ च्या सुमारास स्नान करून सैंपाक व भोजन केलें, आणि प्रार्थना करून एका धर्मशाळेंत झोंपलों. त्या च रात्रीं ताराबाईंना ताप आला. तुळशीचीं पानें वगैरे घालून काढा बनविला व त्यामुळें सकाळपर्यंत त्यांचा ताप कमी झाला.

**ताराबाईंचा ताप**

दुसऱ्या दिवशीं सकाळीं च आम्हीं गुलर चट्टी गांठली. तेथें फराळ करून हळू हळू पुढें चालूं लागलों व ११ वाजतां महादेव चट्टीला पोंचलों. दुपारचें भोजन आदि आटोपून थोडी विश्रांति घेतली. ह्या च वेळीं ताराबाईंना पुन्हा जोरानें ताप आला. लक्ष्मण झूल्यास च आम्हीं विचार केला होता कीं, ताराबाईंच्या तापामुळें आम्हीं सर्वांनीं च हरिद्वारला परत जावें. हिमालयासारख्या पहाडी यात्रेंत निरोगी माणसाला हि जिथें त्रास होतो, तिथें आजारी माणसाबद्दल तर सांगण्याची कांहीं गरज च नाहीं. ताराबाईंना आम्हीं तेथें च पुष्कळ समजावलें होतें व आज हि सांगितलें. पण अजून हि ताराबाई परतण्यास तयार झाल्या नाहींत. शेवटीं त्यांच्या इच्छेनुसार त्या दिवशीं तिथें च थांबून दुसऱ्या दिवशीं पुढें जाण्याचें ठरविलें.

त्या ठिकाणीं ताराबाईंना रात्रीं चांगली झोप येईल अशी एकांत जागा रात्रींच्या मुक्कामासाठीं आम्ही शोधूं लागलों.

नेहमींच्या मुक्कामाच्या ठिकाणीं एक तर गलबला बरा च असे व आजारी माणसाला तेथें राहूं हि देत नसत. तेथें नदी-कांठीं एक मोडकळीस आलेली 'चट्टी' होती. तिच्या चौकी-दारास विचारून आम्ही तेथें गेलों. आंत गेलों तेव्हां कळलें कीं त्या ठिकाणीं हवा व उजेड हि नव्हता. केरकचऱ्याचे ढीग मात्र जागोजागीं पडलेले होते. येण्याजाण्यासाठीं दरवाजा हि एक च होता. अशा स्थितींत आम्ही या चट्टींत झोपूं शकलों नाहीं. रात्रीं थंडी फार जास्त होती व आमच्या जवळ कपडे थोडेसे च होते तरी हि आम्हीं आकाशाखालीं नदीकांठीं च झोंपण्याचें ठरविलें. दंवामुळें कपडे भिजले व मोठया मुष्किलीनें कशी तरी रात्र काढली.

ह्या रात्रीं महादेव चट्टीवर एक विचित्र घटना घडली. नदी-कांठीं आम्ही झोंपल्यानंतर अेक जनावर येऊन त्यानें ताराबेनचें पांघरलेलें घोंगडें आपल्या तोंडांत धरून फाडलें. त्या ओरडल्या तेव्हां जनावर पळून गेलें. अंधारामुळें आम्ही तें जनावर ओळखूं शकलों नाहीं.

सकाळपर्यंत ताराबाईचा ताप उतरला नाहीं. आम्ही उठलों तेव्हां त्या निजून च होत्या. मी जवळ जातांक्षणीं च त्या उठून बसल्या व आपलें आंथरूण बांधून निघण्यासाठीं तयार झाल्या. आम्हीं घाबरून त्यांना अडविलें आणि विचारलें, तुम्ही कुठें चाललां ? त्यांनीं लगेच निश्चयात्मक आवाजांत उत्तर दिलें, 'पुढें जायचें आहे ना?' आम्हीं म्हटलें, 'नाहीं आज आम्ही पुढें जाणार नाहीं. येथें च थांबून आधीं ह्याचा विचार केला पाहिजे कीं पुढें जावें कीं नाहीं.'

'मला हें स्थान पसंत नाही. पुढें जाऊन जिथें चांगली जागा मिळेल तिथें एक दोन दिवस आपण सर्वजणी थांबू.' असें म्हणत त्यांनीं पुढें जाण्याचा च आग्रह धरला. तेव्हां आम्हीं म्हटलें, 'पुढें ह्या पेक्षां चांगली जागा मिळेल च अशी खात्री नाहीं. सुदैवानें मिळाली तरी तेथील मंडळी आपणास आजारी अवस्थेंत राहूं देतील ह्याची शाश्वती नाहीं.' आम्हीं पुनः पुन्हां त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला, पण त्या आपलें सामान घेऊन चालू च लागल्या. शेवटीं आम्हीं म्हटलें, "सामान तरी कुलीजवळ द्या." पण त्याला हि त्या राजी झाल्या नाहींत, व आम्ही हि नाइलाजास्तव पुढें जाऊं लागलों. ४-५ मैलांची चढण चढायची होती. मध्यंतरीं विश्रांति-स्थान हि नव्हत. तारावेनच्या अंगांत ह्या वेळीं हि ताप होता च पण त्या मन घट्ट करून पुढें जात होत्या. उठत बसत चालल्या होत्या. त्या थकल्या आहेत व त्यांच्या अंगांत ताप आहे हें लक्षांत घेऊन मीं त्यांचें सामान घेतलें तरी देखील त्यांना चालणें कठिण झालें होतें. शेवटीं आम्हीं कशी तरी छोटी भिजनीची चट्टी गांठली.

### छोटी भिजनी

येथें पोंचेपर्यंत ११ वाजून गेले. स्नान, भोजनादि केलें. पण विश्रांतीसाठीं येथें थांबणें शक्य नव्हतें. कारण एक तर चारी बाजूला जंगल होतें; व दुसरें तेथें आजाऱ्याला राहूं देत नसत. येथें ताराबाईना पुन्हां ताप आला अशा स्थितींत पुढें जाण्यांत धोका होता. शेवटीं विचार करून ताराबाईना घोडयावर बसवून परत हरिद्वारला नेण्याचें ठरविलें. पण आमचा निर्णय कळतां च ताराबाई फार संतापल्या व म्हणाल्या "मी यात्रा पूर्ण केल्या खेरीज परत जाणार च नाहीं. कोणत्या हि प्रकारें मी देवप्रयागला

तर पोंचणार च. मला मरण च यायचें असेल तर येथें कोठें तरी गंगाकांठीं मरणें च मी पसंत करीन. मरणाची मला भीति वाटत नाहीं."

ताराबाईंचा हट्टी स्वभाव आम्हांला चांगला माहीत होता. म्हणून निरुपायास्तव आम्ही पुढें जाऊं लागलों दांडी, घोडा वगैरे वाहन वापरण्यास हि त्या तयार होईनात. सायंकाळीं सुमारें ४॥ वाजतां ईश्वरावर भरंवसा टाकून आम्ही छोटी भिजनीहून निघालों. अशक्तपणामुळे ताराबाई चालूं शकत नव्हत्या, तरी पण आपली सर्व शक्ति एकवटून हळूं हळू पावलें टाकीत होत्या. थोडें दूर गेल्यानंतर त्या बसल्या, तेव्हां मी त्यांचें सामान एका मैलावर असलेल्या बडया भिजनीच्या चट्टीवर ठेवून परत आलें, व त्यांचा हात धरून मोठ्या मुष्किलीनें 'बडी भिजनी' च्या चट्टीवर त्यांना घेऊन गेलें.

**बडी भिजनी**

येथें पोंचेपर्यंत रात्रींचें ८ वाजून गेले. तसें तर ही चट्टी मोठी होती, पण त्या वेळीं ती यात्रेकरूंनीं भरलेली होती. रामनामाचा जयजयकार चट्टीभर दुमदुमत होता. कित्येक यात्रेकरू जोरजोरानें ओरडून भजन म्हणत होते. अशा अशांत वातावरणांत झोंपणें कठिण होतें ताराबाई तेथून उठून झोंपण्यासाठीं एकांत मिळावा म्हणून एक फर्लांग मागें परतल्या. हें स्थान हि झोंपण्यालायक नव्हतें. कारण एक तर तेथें जंगली जनावरांची भीति होती व दुसरें झोंपेंत कुशीवर वळतांना खालीं खड्यांत पडण्याची धास्ती होती. त्यांना तेथें झोंपण्यांत चौकीदारानें मनाई हि केली.परंतु त्यांनीं ऐकलें नाहीं. मीं हि समजावण्याचा बरा च प्रयत्न केला, पण तापाच्या भरांत त्या मला मारायला धावल्या. शेंवटीं चौकी-

दाराला घेऊन मी त्यांच्या जवळ गेलें, कसें तरी त्यांना समजावलें व यात्रेकरूना विनवून चट्टींतील कोलाहल शांत केला. एक खाट मागवून घेतली व त्यावर ताराबाईना झोंपविले. इंग्रज असल्यामुळें सर्व लोक त्यांचा सन्मान करीत होते. सुमारें दहा वाजतां आम्ही निश्चित होऊन झोपलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून आम्हीं विचार केला कीं २-३ दिवस येथें च थांबावें. पण दुकानदार राजी होईना. ह्याचें एक मुख्य कारण हें होतें कीं ताराबाई आजारी होत्या. त्यांच्या तोंडातून कफ व त्याबरोबर रक्त हि बरें च पडत होतें. कफानें आणि रक्तानें भरलेले कपडे फेकणें हि ह्यावेळीं आम्हांला शक्य नव्हतें. कारण आमच्याजवळ कपडे कमी होते. म्हणून एखाद्या ओहळावर जाऊन मी कपडे धुत असें. अशा प्रकारें ताराबाईचा एक मोठा च विकट प्रश्न आमच्यासमोर उभा झाला. आम्ही गांधींजींच्या अनुयायी आहोंत असें समजून एका भल्या माणसानें एक दिवसभर आमची राहण्याची सोय केली. दुसऱ्या दिवशीं ताराबाईना कसें तरी समजावून घोड्यावर बसविलें. व सहा मैलांवरील बंदर चट्टीला आम्ही दुपारीं ३ वाजेपर्यंत पोंचलों.

## बन्दर चट्टी

हें स्थान भागिरथीच्या अगदीं जवळ आहे. येथें एक धर्मशाळा आहे. पण दुकान नाहीं. त्यामुळें यात्रेकरूंना त्रास होतो. रात्रीं थाडा फराळ करून प्रार्थनेनतर आम्ही झोंपलों. ताराबाईच्या अंगांत पूर्वीसारखा च ताप होता, व अशक्तता पूर्वीपेक्षा बरीं च वाढली होती. अशा स्थितींत घोड्यावर हि त्या बसू शकत नव्हत्या. आम्ही पुढें जाऊ शकत नव्हतों व मागें हि परतू शकत नव्हतों. येथून देवप्रयागपर्यंतचा पायी रस्ता पांच दिवसांचा

होता. चौकशीअंतीं कळलें कीं २ मैलांवर गंगा ओलांडण्यासाठीं घाट आहे व तेथून एक मैलाचा चढाव चढल्यानंतर देवप्रयागला जाणारी मोटारची सडक लागते. ताराबाईनीं देवप्रयागला जाण्याचा संकल्प केला होता. व अशा स्थितींत हि त्यांचा संकल्प कायम च होता. त्यांना असें वाटत होतें कीं देवप्रयाग उंचावर असल्यामुळें तेथें थंडी अधिक असेल व त्या हवेंत त्यांची प्रकृति लवकर सुधरेल.

## आमची ताटातूट व संकटांची परंपरा

ताराबाईच्या सल्यानें च आम्हीं ठरविलें कीं एकीनें त्यांच्या जवळ रहावयाचें व बाकीच्यांनीं पुढें जायचें. सर्वजणींच्या इच्छे-नुसार ताराबाईजवळ राहण्याची कामगिरी मला स्वीकारावी लागली. पहांटे चार वाजतां च बाकीच्या तिघीजणी पुढें जाण्यास तयार झाल्या. आम्ही मधें च अलग होऊं इच्छीत नव्हतों पण ईश्वरेच्छा तशी होती; व ताराबाईच्या आजारामुळें दुसरा कांहीं मार्ग नव्हता.

गंगेच्या घाटापर्यंत ताराबाईना घोड्यावर बसवून मीं आपलें सामान आणण्यासाठीं आंत गेलें. बाहेर येऊन पाहतें तों घोडेवाला आधीं च रवाना झाला होता. तो कोणत्या रस्त्यानें गेला हें मला कळू शकलें नाहीं. रस्ते दोन असल्यामुळें मी गोंधळलें. शेवटीं कोणता तरी एक रस्ता स्वीकारला. तो रस्ता चुकीचा निघाला; त्यामुळें घोडेवाला कसा मिळणार? चालतां चालतां मी घाबरलें. अंधारांत काळ्या काळ्या डोंगराखेरीज दुसरें कांहीं च दिसत नव्हतें. मी पहाडाची चढण चढत होतें, पुष्कळ उंच चढल्यानंतर मनांत विचार आला कीं गंगेच्या घाटाकडे जाणारा रस्ता तर खालीं जाणारा असला पाहिजे. म्हणून मी परत बंदरचट्टीला आलें.

दाराला घेऊन मी त्यांच्या जवळ गेलें, कसें तरी त्यांना समजावलें व यात्रेकरूंना विनवून चट्टींतील कोलाहल शांत केला. एक खाट मागवून घेतली व त्यावर ताराबाईंना झोपविलें. इंग्रज असल्यामुळें सर्व लोक त्यांचा सन्मान करीत होते. सुमारें दहा वाजतां आम्ही निश्चित होऊन झोपलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून आम्हीं विचार केला कीं २-३ दिवस येथें च थांबावें. पण दुकानदार राजी होईना. ह्याचें एक मुख्य कारण हें होतें कीं ताराबाई आजारी होत्या. त्यांच्या तोंडातून कफ व त्याबरोबर रक्त हि बरें च पडत होतें. कफानें आणि रक्तानें भरलेले कपडे फेकणें हि ह्यावेळीं आम्हांला शक्य नव्हतें. कारण आमच्याजवळ कपडे कमी होते. म्हणून एखाद्या ओहळावर जाऊन मी कपडे धून असें. अशा प्रकारें ताराबाईंचा एक मोठा च बिकट प्रश्न आमच्यासमोर उभा झाला. आम्ही गांधींजींच्या अनुयायी आहोंत असें समजून एका भल्या माणसानें एक दिवसभर आमची राहण्याची सोय केली. दुसऱ्या दिवशीं ताराबाईंना कसें तरी समजावून घोड्यावर बसविलें. व सहा मैलांवरील बंदर चट्टीला आम्ही दुपारीं ३ वाजेपर्यंत पोंचलों.

**बन्दर चट्टी**

हें स्थान भागिरथीच्या अगदीं जवळ आहे. येथें एक धर्मशाळा आहे. पण दुकान नाहीं. त्यामुळें यात्रेकरूंना त्रास होतो. रात्रीं थोडा फराळ करून प्रार्थनेनतर आम्ही झोपलों. ताराबाईंच्या अंगांत पूर्वीसारखा च ताप होता, व अशक्तता पूर्वीपेक्षा बरीं च वाढली होती. अशा स्थितींत घोड्यावर हि त्या बसूं शकत नव्हत्या. आम्ही पुढें जाऊं शकत नव्हतों व मागें हि परतूं शकत नव्हतों. येथून देवप्रयागपर्यंतचा पायी रस्ता पांच दिवसांचा

होता. चौकशीअंती [illegible] आलें, तेव्हां आतां घाट आहे व तेथून एक मैलाचा चढाव [illegible] जाणारी मोटारची सडक लागते. ताराबाईंनी [illegible] जाण्याचा संकल्प केला होता व अशा स्थितींत हि [illegible] संकल्प कायम च होता. त्यांना असें वाटत होतें कीं देवप्रयाग उंचावर असल्यामुळें तेथें थंडी अधिक असेल व त्या हवेंत त्यांची प्रकृति लवकर सुधरेल.

## आमची ताटातूट व संकटांची परंपरा

ताराबाईच्या सल्यानें च आम्हीं ठरविलें कीं एकानें त्यांच्या जवळ रहावयाचें व बाकीच्यांनीं पुढें जायचें. सर्वजणींच्या इच्छे-नुसार ताराबाईजवळ राहण्याची कामगिरी मला स्वीकारावी लागली. पहांटे चार वाजतां च बाकीच्या तिघीजणी पुढें जाण्यास तयार झाल्या. आम्ही मधें च अलग होऊं इच्छीत नव्हतों. पण ईश्वरेच्छा तशी होती; व ताराबाईच्या आजारापुढें दुसरा कांहीं मार्ग नव्हता.

गंगेच्या घाटापर्यंत ताराबाईंना घोड्यावर बसवून मी आपलें सामान आणण्यासाठीं आंत गेलें. बाहेर येऊन पाहतें तो घोडेवाला आधीं च रवाना झाला होता. तो कोणत्या रस्त्यानें गेला हें मला कळूं शकलें नाहीं. रस्ते दोन असल्यामुळें मी गोंधळलें. शेवटीं कोणता तरी एक रस्ता स्वीकारला. तो रस्ता ...ीचा निघाला; त्यामुळें घोडेवाला कसा मिळणार? अंधारांत काळया का... नव्हतें. मी पहा... मनांत... खा...

व एका माणसाला उठवून गंगा-घाटाचा रस्ता विचारला. त्यानें खालच्या बाजूस जाणारा मार्ग दाखविला. मी ह्या दुसऱ्या मार्गानें चालू लागलें दूर गेल्यानंतर झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्याचा आवाज ऐकूं येऊं लागला. झऱ्यावर प्रातर्विधि आटोपून थोडी दूर गेलें व सूर्योदयाची वाट पाहत एका खडकावर बसलें. येथें प्रार्थना केली. खालीं वाहणाऱ्या गंगेच्या ओघाचा प्रतिध्वनि ऐकूं येत होता. अंधारांत घाटाचा रस्ता दिसत नव्हता.

**नामस्मरणाचा आधार**

ह्या वेळच्या माझ्या मन स्थितीचें वर्णन करणें मला शक्य नाहीं. पहाडामुळें अधिक च भीषण भासणाऱ्या ह्या निर्जन जंगलांत मी एकटी बसलें होतें माझा धीर खचत चालला होता. माझ्या चिंतेचें व हवालदील होण्याचें एक कारण हें होतें कीं सर्व जणींचें मिळून सुमारें २५० रुपये व बाकीच्या मैत्रिणींचें कांहीं सामान माझ्या जवळ च होतें. मी मोटारनें लवकर पोंचेन अशा समजुतीनें प्रत्येकीनें आपले पैसे व कांहीं सामान मजजवळ दिलें होतें. अशा चिंतित परिस्थितींत 'नाम-स्मरणानें मला पुन्हां शक्ति व धैर्य लाभलें केव्हां केव्हां अनेक प्रकारची दुर्बलता प्रकट करणारे विचार मनांत येत व मी भांबावून जाई. "जंगली जनावरांच्या किंवा चोर-लुटारूंच्या तावडींत सांपडून मृत्यु आला तर माझ्या मैत्रिणी व ताराबाई यांना ती बातमी कशी कळेल ? ज्यांनीं मजवर विश्वसून आपले सर्व रुपये, पैसे माझ्या हवालीं केले त्यांचे काय हाल होतील ?" असे विचार मनांत येत. स्वतःच्या मृत्यूचें मला भय वाटत नव्हतें. शेंवटीं ईश्वरावर भरंवसा टाकून मीं समाधान मानलें. व हृदयांतून हळूं हळूं आवाज निघाला, "हे प्रभो, तुझें च फक्त अस्तित्व

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलांतर

आहे व तूं माझी परीक्षा पाहत आहेस असें दिसतें. तुझा मी टोणपा झालों, बुद्धि दे रघु-नायका ' ह्या विचारानें शेवटीं मला समाधान लाभलें.

अरुणोदय अजून झाला नव्हता. पण तारे लोपले होते. पक्ष्यांचा किलकिलाट सुरु झाला होता. सर्व दिशा गालांतल्या गालांत हंसत होत्या. पूर्वेकडे उषादेवी प्रकटली. तिनें भगवान् भास्कराच्या आगमनाची वर्दी दिली. स्वत चेतन असून हि ज्या खडकावर मी बसलें होतें त्या खडकाप्रमाणें च जड झालेल्या माझ्या शरीरांत हि नवचैतन्य संचरलें व मी रस्ता पाहूं लागलें.

नेमकें ह्या च वेळीं दुरून 'बोलो गंगामाई की जय, बोलो बदरीकेदार की जय ' असा यात्रेकरूंचा जयजयकार कानावर पडला. ह्या आवाजानें चारी दिशा दुमदुमून गेल्या. यात्रेकरूंचे थवेच्या थवे येऊं लागले. मीं एकाला विचारलें, 'बाबाजी, गंगाजी ओलांडण्याचा रस्ता कोणता ?' मला एकटीला भटकतांना पाहून बाबाजींनीं आश्चर्य व करुणायुक्त स्वरांत विचारलें, 'माईजी तुम्ही इकडे कुणीकडे ?' मीं आपली कहाणी सांगितली.

**नावाड्याचें परिवर्तन**

रस्ता मिळतांच मी धावूं लागलें. घाटावर पोंचतांच ताराबाईंना पाहून मला अत्यंत आनंद झाला. त्या माझी चिंता करीत घोंगडीवर पडल्या होत्या. घोडेवाला मला शोधीत होता. त्याला पैशाची घाई झाली होती. दीड रुपया त्याला दिला व गंगापार करण्यासाठीं नावाड्यास बोलावलें. त्यानें एकदम दहा रुपये मागितले. मीं म्हटलें, 'अरे भाऊ, एवढी छोटीशी नदी पार करायला पांच मिनिटें हि बहुधा लागणार नाहींत. तरी हि तूं दहा रुपये मागतोस ?' त्यानें परवा न करतां उत्तर दिलें, 'कां

नको मागूं ? ही तर इंग्रज मेमसाहेब आहे. तुम्ही हि कोणी सेठाणी असाल. तुमच्या सारख्या धनिकांकडून पैसे नाहीं घ्यायचे तर काय फकिरांकडून घ्यायचे ?' हें ऐकून त्या अडचणीच्या प्रसंगीं हि मला हंसू आलें. खादीचा शुभ्र पोशाख असून हि मला सेठाणीची पदवी मिळाली ह्या विचारानें मला आश्चर्य वाटत होतें. मीं नावाड्यास म्हटलें " तुझें म्हणणें बरोबर आहे. आम्ही धनिक आहोंत, पण कसे तें माहीत आहे का ? आमचा खजिना ईश्वराजवळ आहे. तो उदारपणें आमच्या सर्व गरजा भागवितो. तुला हि जर आमच्या प्रमाणें धनवान् व्हायचें असेल तर ईश्वरावर श्रद्धा ठेव, व सत्य स्वीकारून लोभीपणा सोडून दे. आम्हांला लवकर मोटार गाठावयाची आहे. तुझा योग्य तो मेहनताना आम्ही देऊं च. आतां उशीर करूं नकोस." त्यानें कांहीं न बोलतां आम्हांस लगेच पैलतीराला पोंचविलें. पलीकडे जातां च एका मोठ्या दगडावर मीं घोंगडी आंथरली व त्यावर ताराबाईंना निजविलें. येथून सडकेपर्यंत जाणें सोपें नव्हतें. सडक एका मैलावर होती. परंतु सरळ रस्ता कोठें च नव्हता. जिन्याच्या पायऱ्यांप्रमाणें लहान मोठ्या खडकावरून उड्या मारीत वर चढायचें होते. ह्या रस्त्यानें स्वत:चें व मैत्रिणींचें सामान आणि ताराबाई यांना घेऊन जाणें मला फार च कठिण वाटलें. मी विचार करूं लागलें कीं आतां काय करावें ? प्रथम सामान सडकेवर नेऊन ठेवायचें व मग ताराबाईना न्यायचें असें करणें मला योग्य वाटलें नाहीं. कारण सामान चोरी जाण्याचा धोका होता. शेंवटीं कल्पना सुचली कीं आपली नजर पोंचेल इतक्या अंतरावर आधीं सामान नेऊन ठेवावें व परत येऊन ताराबाईना तेथपर्यंत न्यावें. हा च एक मात्र उपाय शक्य होता. अशा प्रकारें तीन-चार टप्पे मीं गांठले.

चौथ्या वेळीं मी ताराबाईंना नेण्यासाठीं आलें, तेव्हां आतांपर्यंत माझी ही सर्व कारवाई पहात असलेला तो नाववाला मजजवळ आला व अत्यंत नम्रतापूर्वक म्हणाला, 'माईजी, मेमसाहेबांना स्वतःच्या पाठीवर घेऊन मी सहज सडकेपर्यंत पोंचवून देतों. तुम्ही इतका त्रास घेऊं नका.' मीं हंसून म्हटलें, 'अरे भाऊ, नदीपार करण्याचे च तूं दहा रुपये मागितलेस ! आतां सडकेवर पोंचविण्याचे किती रुपये मागशील कोण जाणे ! आम्हांला येथें च आमची जीवनयात्रा संपवायची नाहीं. पुढें जायचें आहे. आमच्या जवळ जे थोडेसे पैसे आहेत ते सर्व तुला च देऊन आम्ही काय गंगेमधें जल-समाधि घ्यावी म्हणतोस ?" त्यानें कांहीं उत्तर न देतां आमचें सर्व सामान सडकेकांठच्या आपल्या घराजवळ नेऊन ठेवलें व पुन्हां येऊन ताराबाईंना हि स्वतःच्या पाठीवर घेऊन सडकेवर आला. तेथें एका झाडाखालीं मीं ताराबाईंना झोंपविलें. पाणी, दूध व चहा हि त्या नाववाल्यानें आणून दिला. मीं चहा तयार करून ताराबाईंना पाजला. नंतर नाववाल्यास विचारलें, 'तुझी मजुरी व उपकाराची परत फेड म्हणून काय देऊं ?' त्यानें उत्तर दिलें 'तुमचें साहस पाहून मी आश्चर्यचकित झालों. तुमच्याकडून एक हि पैसा मी घेऊं इच्छीत नाहीं. त्याचें हें उत्तर ऐकून मला आश्चर्य वाटलें.

ह्या प्रसंगामुळें पू. बापूजींच्या सत्यअहिंसांतर्गत प्रेमतत्त्वाचें मला दर्शन झालें. इतक्या थोड्या वेळांत त्या माणसाच्या हृदयांत किती परिवर्तन झालें होतें ! त्यावेळीं मला गीतेंतील खालील श्लोक आठवला.

"राहिला सर्व भूतांच्या हृदयीं परमेश्वर ।" गीताई
"ईश्वरः सर्व भूतानाम् हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।" गीता

कोणी हि मनुष्य मुळांत वाईट नसतो. सर्वांच्या अंतर्यामीं एक च प्रेम-प्रवाह वाहत असतो याचें दर्शन झालें. मीं त्याला सहा आणे दिले; व प्रसन्नतापूर्वक त्यानें ते स्वीकारले.

**देवप्रयाग व ताराबाई**

मोटारची वाट पाहतां पाहतां दुपारचे दोन वाजले. लॉरीनें सायंकाळीं ३॥ च्या सुमारास आम्ही देवप्रयागच्या मोटार स्टँडवर पोंचलों. देवप्रयागची वस्ती स्टँडपासून सुमारें दीड मैल दूर आहे. जाण्याचा रस्ता म्हणजे एक लहानशी पाउल वाट, व ती हि सपाट नाहीं. उतार इतका आहे कीं चांगल्या माणसाचीं हि पावलें घसरूं नयेत म्हणून सांभाळावें लागतें. ताराबाईची स्थिति तर आतां इतकी खराब झाली होती कीं, कंडीमधें हि बसणें त्यांना शक्य नव्हतें. दांडीमधें ( पालखी ) जाण्याची त्यांची तयारी नव्हती. डोंगरावर असून हि येथें उष्णता बरी च होती. गरम वारे वाहत होते. ताराबाईची पहिल्यापासून अशी समजूत होती कीं देवप्रयागची हवा फार थंड असेल व तेथें जातां च आपल्याला शांति लाभेल. पण वस्तुस्थिति अगदीं च उलटी होती. देवप्रयागच्या गांवांत जाण्याची हि आतां त्यांना भीति वाटूं लागली. त्यापेक्षां मोटार-स्टँड जवळील खुलें मैदान त्यांना पसंत होतें. त्यांचा वाढता ताप पाहून माझा विचार त्यांना गांवांत डॉक्टरकडे नेण्याचा होता. शेंवटीं त्यांचा आग्रह लक्षांत घेऊन त्यांना स्टँडवर च राहूं दिलें व मी गांवांत डॉक्टरला बोलावण्यास गेलें.

चौकशी करीत करीत मोठ्या प्रयासानें दवाखान्यांत पोंचलें. डॉक्टरांना सर्व हकीकत सांगितली. त्यांनीं एकदम उत्तर दिलें, "ठीक आहे. तुम्ही जाऊन त्यांना पालखींतून घेऊन या." मीं म्हटलें, "त्या आपणांस स्टँडवर च भेटूं इच्छितात. आपण इतकी

तसदी घ्याल तर आपले फार उपकार होतील." कंपाउंडरसह डॉक्टर स्टँडवर आले. ताराबाईची स्थिति फार खराब आहे हें त्यांच्या लक्षांत आलें. त्यांना डोलींत निजवून दवाखान्यांत आणलें. म. गांधींची अनुयायी मानून त्यांनीं फार प्रेमानें उपचार केला. शक्य त्या इतर सुखसोयी निःस्वार्थ भावनेनें करून दिल्या. गरम वाऱ्याचा त्रास होऊं नये म्हणून ओली घोंगडी स्वतः च ताराबाईच्या चारी बाजूला बांधली. इतकें सर्व करून हि त्या दिवशींची उष्णता आणि तापामुळें वाढलेला दाह त्यांना सहन झाला नाहीं. शेंवटीं फार दुःखित अंतःकरणानें त्या मला म्हणाल्या 'मीं तुम्हांला उगीच च त्रास दिला. आतां कसें तरी मला हरिद्वारला पोंचवा. येथील उष्णता मी सहन करूं शकत नाहीं.'

ताराबाईनीं अशा स्थितींत हरिद्वारचा प्रवास करण्यांत धोका होता. ताप थोडा कमी झाला होता, पण अशक्तता फार वाढली होती. डॉक्टरांनीं हरिद्वारला जाण्याची ज्या दिवशीं परवानगी दिली त्या च दिवशीं पायीं यात्रा करणाऱ्या आमच्या तीन मैत्रिणी हि देवप्रयागला येऊन पोंचल्या. त्याचें हि मत असें च पडलें कीं ताराबाईना हरिद्वारला गुरुकुल कांगडींत पोंचवावे. मीं त्यांना सांगितलें कीं ताराबाईची प्रकृति सुधारली नाहीं तर तुम्हांला तार करीन व तुम्ही तार मिळतां च परत या. माझ्याकडून सूचना मिळेपर्यंत तुम्ही येथें च देवप्रयागला थांबा.

येथें प्रसंगाच्या ओघांत हें हि सांगणें उपयुक्त होईल कीं ह्या यात्रेंत गंगोत्रीपर्यंत फक्त देवप्रयागला च दवाखाना आहे. टिहरी संस्थानामार्फत तो चालतो. हवा व प्रकाशाच्या दृष्टीनें विचार करतां दवाखान्याची इमारत अगदीं च अनुपयुक्त आहे. दुसऱ्या कोणत्या हि ठिकाणीं दवाखाना नसणें ही तर धार्मिक व श्रद्धाळु

स्त्री-पुरुषांच्या दृष्टीनें फार लांछनास्पद गोष्ट आहे. टिहरीच्या संस्थानिकांनीं व भारतीय जनतेनें ह्याचा विचार करावा.

ताराबाईंना हरिद्वारला पोंचविण्यासाठीं डॉक्टरांनीं एक रिकामी मोटार-लॉरी मिळवून दिली. गुरुकुल-कांगडीला आगाऊ सूचना म्हणून तार केली. ता. १३-५-३५ रोजीं सकाळीं ५ वाजतां निघतांना औषध आदींच्या खर्चाबद्दल १० रु. मी डॉक्टरांना देऊं लागलें. पण त्यांनीं स्वीकारले नाहींत. ते म्हणाले, "तुम्ही कांहीं देऊं इच्छीत च असाल तर ह्या पाणीवाल्याला द्या. कारण येथें पाणी फार खालून आणावें लागतें. आम्ही हि पैसे देऊन च पाणी आणतों." पाणीवाल्याला दोन रुपये देऊन मीं डॉक्टरांची रजा घेतली व ताराबाईंना पालखींतून स्टँडवर आणून मोटारींत झोंपविलें. सुमारें साडे-सहा वाजतां आम्ही देवप्रयागच्या मोटार स्टँडवरून निघालों.

बरा च प्रवास केल्यानंतर एका चट्टीवर मोटार पुष्कळ वेळ थांबली. तेथें ताराबाईंना मोटारींतून खालीं उतरवून चहा पाजला. थोड्या वेळानें त्या म्हणाल्या, "मला असें वाटतें कीं ह्या आजारांतून मी वाचणार नाहीं. तुम्ही नोटबुक काढून लिहून घ्या कीं "इंग्लंडांत माझी जी कांहीं धन-दौलत आहे ती सर्व मीं पू. बापूजींना अर्पण केली आहे. आश्रमांत राहणारी इंग्रज महिला मिस् मेरी बार माझा इंग्लंडांतील पत्ता जाणते. ती सर्व कांहीं सांगेल." मीं त्यांना म्हटलें 'तुम्ही च इंग्रजींत आपला पत्ता लिहून द्या.' त्या म्हणाल्या "मी ह्या वेळीं लिहूं शकत नाहीं हरिद्वारला गेल्यानंतर सत्यदेवजींकडून लिहून देईन.' ह्या वेळीं मला फार वाईट वाटत होतें. पण मीं आपलें दुःख प्रयत्नपूर्वक दाबलें. सुमारें एक तासभर थांबून आमची मोटार पुन्हां चालू लागली. ह्या

वेळीं ताराबाईंची प्रकृति क्षणोक्षणीं घसरत होती. त्या माझ्या मांडीवर झोपल्या होत्या. वारंवार मला हांक मारीत. माझे हात धरून त्यांचें चुंबन घेत, व माझ्या खांद्यावर हात ठेवून मला आलिंगन देण्याचा प्रयत्न करीत. थोड्या वेळानें पुन्हा हांक मारीत. मीं म्हटलें 'ताई, मला पुन्हां पुन्हां कां हांक मारता ? मी तुमच्या-साठीं काय करूं शकतें ? शांत-चित्त होऊन ईश्वराचें स्मरण करा. तो च तुम्हांला ह्या दुःखद त्रासांतून मुक्त करूं शकतो. वारंवार मोठ्यानें हांका मारल्यामुळें तुमचा गळा सुकून जाईल.' माझें हें म्हणणें ऐकून त्या स्तब्ध झाल्या. त्यांना स्तब्ध आणि चिंतित पाहून मीं विचारलें 'बोलूं शकत नाहीं काय ? कशाचा विचार करीत आहां ?' त्या गंभीरपणें बोलल्या 'आतां तुम्हीं च तर सांगितलें होते ना कीं ईश्वर-स्मरण करा ? मी त्याचें च ध्यान करतें आहे. तुम्ही घाबरूं नका.' ह्या वेळीं ताराबाई उष्णतेमुळें फार अस्वस्थ होत्या. सारख्या ह्या कुशीवरून त्या कुशीवर होत होत्या. ओल्या कपड्यानें मीं त्यांना वारा घालीत आधार देऊन बसविलें. हरिद्वारला केव्हां पोंचूं असें त्या पुन्हां पुन्हां विचारीत असत. 'महादेवीताई, माझ्यामुळें तुम्हांला फार त्रास झाला, फार कष्ट करावे लागले.' असें म्हणतां म्हणतां त्यांचा गळा भरून येई. त्यांना समाधान वाटावें म्हणून मी म्हणत असें, "तुम्ही चिंता करूं नका. तुमची सेवा करण्यापेक्षां अधिक आनंद-दायी काम मला दुसरें कोणतें आहे ? ही सेवा करण्यांत मला कांहीं च कष्ट वाटत नाहींत."

हृषीकेश अजून थोडें दूर होतें. त्या म्हणूं लागल्या 'अरे लवकर चल. मला देवाघरीं जायचें आहे. उशीर करूं नकोस' मीं म्हटलें 'बाई घाबरूं नका. आपण ईश्वराजवळ च आहों. भगवान

आपल्यापासून शेंकडों कोस दूर नाहीं. त्याच्याजवळ जाण्यासाठीं शारीरिक धावपळ करण्याची गरज नाहीं. आपली दृष्टि अंतर्मुख करा. ईश्वर आपल्या भावनेंत च समावलेला आहे.' अशा च प्रकारें कांहीं गोष्टी करीत आम्ही हृषीकेशला पोंचलों. ताराबाईंची प्रकृति लक्षांत घेतां येथून हरिद्वारला जाण्यासाठीं स्पेशल मोटार करणें मला आवश्यक वाटलें.

## ताराबाईचें निधन

हरिद्वारचें भाडें मोटारवाला वीस रुपये मागूं लागला. मीं म्हटलें आम्हांला लवकर जायचें आहे. आमची ही परिस्थिति पाहून योग्य तें भाडें घे. इतक्यांत एक दुसरा मोटारवाला येऊन म्हणाला, 'माई, मी आपली मोटार घेऊन येतों. मला फक्त चार रुपये द्या.' मोटार येतां च ताराबाईंना मांडीवर घेऊन मी बसलें. त्यांचा श्वासोच्छ्वास जोरानें चालू होता. बोलणें आतां बंद झालें होतें. त्यांच्या कानाजवळ मी रामनामाचा उच्चार करीत होतें. आम्ही जेमतेम तीन फर्लांग आलों असूं. ताराबाई हरिद्वारपर्यंत हि जाऊं शकणार नाहींत अशी शंका माझ्या मनांत आली. मीं मोटारवाल्याला विचारलें, 'येथें जवळपास कोठें दवाखाना आहे का ?' तो म्हणाला 'दवाखाना तर तीन फर्लांग मागें राहिला. तुम्ही म्हणत असाल तर मी मोटार परत वळवितों.' दवाखान्यांत गेल्यानंतर थोडचा वेळानें ताराबाईंना पाहतां च डॉक्टर हळूं च म्हणाले 'आतां ह्यांच्या आयुष्याची शेंवटचीं दोन तीन मिनिटें च उरलीं आहेत.' दुपारीं अकराच्या सुमारास एक दोन लांब सुस्कारे टाकून मोटारींत च ताराबाईंनीं आपली इहलोकची यात्रा संपविली.

ह्या वेळच्या माझ्या मन:स्थितीचें वर्णन मी कसें करूं ? माझ्या अंत:करणांत भयंकर वेदना होत होत्या. मी सारखी त्यांच्या

तोंडाकडे टक लावून पाहत होतें. दोन्ही डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. किती तरी वेळ त्यांना तशी च मांडीवर घेऊन बसलें होतें. शेंवटीं डॉक्टरांनीं मला हांक मारली व म्हटलें, 'देवीजी, ह्यांना मांडीवर घेऊन किती वेळ बसणार ? त्यांना खालीं ठेवा व अंत्यविधीची तयारी करा.' त्यांचे हे शब्द ऐकून मी शुद्धीवर आले, व आपल्या प्राप्त कर्तव्याचें मला भान झालें. नंतर मीं डॉक्टरांना म्हटलें, 'यांची इच्छा हरिद्वारला पोंचण्याची होती; ती पूर्ण झाली नाहीं. त्यांचा अंत्यविधि हरिद्वारला गुरुकुल कांगडींत झाला तर बरें.' त्यांची संमति घेऊन त्या च मोटारनें ताराबाईचें शव गुरुकुल कांगडीस नेलें.

दुपारचे दोन वाजले असतील. मी सत्यदेवजींच्या घरीं गेलें. त्यांना सर्व हकीकत सांगितली. त्यांनीं ताबडतोब गुरुकुलाचे आचार्य श्री. देवशर्माजी (आतां श्री. स्वामी अभय देवजी) यांना कळविलें. गुरुकुलच्या दवाखान्यांत ताराबाईचें शव ठेवण्यांत आलें. सत्यदेवजींच्या घरीं स्नान करून मीं थोडी विश्रांति घेतली. सुमारें पांच वाजतां संध्याकाळीं मी माझी महिलाश्रमांतील मैत्रीण सुमित्राबाई (या ताराबाईबरोबर बैतूलला काम करीत होत्या, प्रकृति ठीक नसल्यामुळें हवाफेर करण्यासाठीं ताराबाईनीं च त्यांना येथें आणलें होतें व त्यांच्या आधारें च येथें राहिल्या होत्या.) यांच्यासह दवाखान्यांत गेलें. शवाला शेंवटचें स्नान घालून खादीचें कापड नेसविलें. शव-यात्रेबरोबर गुरुकुलचे सारे अध्यापक व ब्रह्मचारी स्मशानांत आले. वेदोक्त विधिपूर्वक तूप, चंदन वगैरे सर्व सुगंधित वस्तूंसह संपूर्ण दहन-संस्कार केला. चितेवर ठेवलें असतां ताराबाईचा शेंवटचा फोटो हि घेतला. ताराबाईचे चांगले कपडे, घोंगडी वगैरे सर्व मीं गरिबांना वाटून दिलें.

ताराबाईंच्या मृत्यूच्या दुःखांत हि 'नश्वर-शरीरांत ह्यापेक्षां अधिक सौभाग्याचा प्रसंग क्वचित च कोणास प्राप्त होत असेल' अशा विचारानें मला कांहींसा आनंद होत होता. गीतेमधें श्रीकृष्ण म्हणतात 'अंतकाले च मामेव स्मरन् मुक्त्वा कलेवरम् । यः प्रयाति स मद्भावम् याति नास्त्यत्र संशयः ॥ "

हिमालयासारख्या पवित्र प्रदेशांत गंगेच्या पावन तीरावर ईश्वराचें ध्यान करीत करीत देह विसर्जन करणें आत्म्याच्या दृष्टीनें खरोखर गौरवास्पद आहे. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पहाटें चार वाजतां उठून पू. जमनालालजींना मीं पत्र लिहिलें व त्यांत ह्या मृत्यूची बातमी त्यांना कळविली.

सकाळीं साडे पांचच्या सुमारास मी गुरुकुलामधून निघालें व मोटारनें सायंकाळीं पांच वाजतां देवप्रयागला येऊन आपल्या मैत्रीणींना भेटलें. त्यांना सर्व हकीकत सांगितली, व विचारलें "आतां परत जाऊं इच्छिता कीं पुढें जायचें ? मला तर सर्व लोकांनीं पुढें जाण्यास मनाई केली आहे. अडचणींना तोंड देण्याची हिंमत असेल तर पुढें जाण्याची तयारी करा; नाहीं तर परतणें च श्रेयस्कर. माझा निश्चय तर पक्का आहे. तुम्ही कोणी न आलां तरी हि मी हिमालय-यात्रा पुरी करणार." थोडा विचार करून सर्वांनीं पुढें जाण्याचें ठरविलें.

o o o

## ६
## तीर्थ-क्षेत्रें

**देवप्रयाग**

पहाडावर वसलेलें हें एक रमणीय स्थान आहे. अलकनंदा व गंगा यांचा संगम येथें होतो. त्यामुळें ह्या गांवच्या सौंदर्यांत फार भर पडली आहे. ह्या ठिकाणच्या संगमाचा प्रवाह इतका जोरदार आहे कीं स्नान करतांना वाहून जाण्याचा धोका असतो; म्हणून लोक साखळी करून स्नान करतात. पंड्यांचा तर येथें अड्डा च आहे. बद्रीनाथ, गंगोत्री वगैरे ठिकाणचे पंडे मुख्यत: इथले च राहणारे. त्यांचीं सुमारें चारशें घरें येथें आहेत. यात्रेकरू दिसतां च हे त्यांच्या मागें लागतात. 'तुमचा पंडा कोण ?' इत्यादि प्रश्न विचारूं लागतात. त्यांच्या प्रश्नाला "आमचे पंडे आम्ही च आहोंत, यात्रेला येण्याचें ठरविलें तेंव्हां च स्नानादींचा संकल्प आम्हीं केला." अशा प्रकारचीं उत्तरें हंसतमुखानें आम्हीं त्यांना दिलीं. आमचीं अशीं उत्तरें ऐकून ते म्हणत, 'तुम्ही गांधींच्या शिष्य दिसतां.' त्यांची ही पदवी आम्ही सहर्ष स्वीकारीत होतों. त्यामुळें च दक्षिणा वगैरेबाबत ते आम्हांला त्रास देत नसत.

येथें चांगलीं मोठमोठीं दुकानें असल्यामुळें खाण्यापिण्याच्या सर्व आवश्यक वस्तु मिळतात. येथें बाबा कालीकमलीवाले यांचें सदा-वर्त व धर्मशाळा हि आहे. पोस्ट, तारघर आणि दवाखाना हि आहे. गंगोत्री व जम्नोत्रीचे यात्रेकरू येथें च भागिरथी ओलांडतात. टिहरी येथून ४-५ मैल आहे. तारीख १५-५-३५ रोजीं पूल ओलांडून आम्ही जम्नोत्रीला जाण्यास निघालों.

## टिहरी

दुपारीं बाराच्या सुमारास आम्ही टिहरीला जाऊन पोंचलों. गढवाल देशाची ही राजधानी. गंगेच्या कांठीं गांव वसलें आहे. पर्वतश्रेणींतून वाहत गंगा येथें येते. आजचा पूर्ण दिवस आम्हीं येथें च घालविला. दुसऱ्या दिवशीं पहांटे चार वाजतां प्रार्थना करून आम्ही पुढें निघालों. सहा मैलांवर एक चट्टी लागली. तेथें भोजन व विश्राम करून सायंकाळीं साडेचारला तेथून निघालों; व चार मैल चालून एक छोटीशी चट्टी गांठली.

## म्हातारीची कथा

ह्या चट्टीचा रस्ता फार कठिण आहे. ह्या रस्त्यांतील एक विचित्र घटना अजून हि माझ्या चांगली लक्षांत आहे. रस्त्याच्या चढणीमुळें थकलेली, रडत, कण्हत, असलेली एक म्हातारी मला दिसली. ती असहाय होती; चालून चालून पायाला सूज आली होती. बरोबर ओझें हि पुष्कळ होतें. रस्त्यांत च अंधार होईल ह्या भीतीनें ती फार व्याकुळ होती. मीं तिला विचारलें 'तुला मी कोणती मदत करूं?' तिनें उत्तर दिलें, 'मुली, तूं मला कोणती मदत करूं शकशील ? तुझ्याजवळ आधीं च पुष्कळ ओझें आहे. माझे साथी व इतर हि अनेक साधु-वेषधारी तरुण यात्रेकरू माझी ही स्थिति पाहून पुढें निघून गेले.' तिची ही काहणी ऐकून मला फार वाईट वाटलें. म्हातारीला अशा स्थितींत सोडून जाणें मला असह्य होतें. तिला चट्टीपर्यंत कसें पोंचवावे ह्याचा मी विचार करूं लागलें.

ह्या दिवशीं माझी तब्येत ठीक नव्हती. मासिक धर्मामुळें फार अशक्तता वाटत होती. आपलें स्वत:चें सामान उचलणें च जड जात होतें. अशा स्थितींत हि असहाय म्हातारीची उपेक्षा

करणें मला शक्य नव्हतें. माझा आत्मा ही गोष्ट सहन करूं शकेना. मीं म्हातारीचें सामान उचलून पाहिलें. तें फार वजनदार होतें. मीं तिला विचारलें, 'आई, हें सर्व सामान तुम्हीं स्वतः च उचलून आणलें कीं कोण्या कुलीनें आणलें ?' म्हातारी म्हणाली 'नाहीं, कुलीची काय गरज ? मीं स्वतः च आणलें.' मला फार आश्चर्य वाटलें. म्हातारीच्या साहसाचें कौतुक करीत मी परमेश्वराची प्रार्थना करूं लागलें. 'हे प्रभो, ह्या म्हातारीसारखी साहसीवृत्ति थोडा वेळ तरी मला दे; म्हणजे या म्हातारीला तिच्या सामानासह एखाद्या सुरक्षित ठिकाणीं मी पोंचवू शकेन.'

ह्यानंतर मीं तिचें सामान पाठीवर घेतलें व तिला हि हात धरून नेऊं लागलें. अशा प्रकारें चालण्यांत मला फार त्रास होत आहे हें ओळखून म्हातारी म्हणाली, 'मुली तूं पुढें चल; मी हळूं हळूं मागून येतें.' तीन मैल चालल्यावर एक चट्टी लागली. सर्व सामान मीं तेथें ठेवलें. माझ्या मैत्रिणी हि आधीं च येथें पोंचल्या होत्या व माझी वाट पाहतहोत्या. थोड्या वेळानें म्हातारी येईल अशी माझी अपेक्षा होती. पण ती आली नाहीं. तेव्हां मी परतलें. बरेंच दूर गेल्यावर रस्त्याच्या बाजूला बेशुद्ध पडलेली ती म्हातारी दिसली. तहानेमुळें तिचें तोंड कोरडें पडलें होतें. जवळपास कोठें पाणी नव्हतें. पाणी घेण्यासाठीं मी पुन्हां त्या चट्टीवर आलें. व थोड्या वेळानें तिचा हात धरून कसें तरी तिला एकदाचें चट्टी-पर्यंत आणलें.

ही चट्टी फार लहान होती. विश्रामासाठीं पुरेशी जागा हि तिथें नव्हती. पाणी हि फार खोलगट जागेंत होतें. दुकानदार राहूं देण्यास तयार नव्हता. अशा स्थितींत म्हातारीला तेथें च सोडून जाणें मला बरें वाटलें नाहीं. तेथून थोड्या अंतरावर एक

धर्मशाळा होती. आपल्या मैत्रीणींची नाराजी पत्करून हि म्हातारीला त्या धर्मशाळेंत पोंचवावें असें मीं ठरविलें. स्वतःचें कर्तव्य टाळणें हें मानसिक दुर्बलतेचें लक्षण आहे असें मला वाटलें. मी एकटी च त्या म्हातारीला घेऊन धर्मशाळेंत गेलें. ह्यावेळीं रात्रीचें ८ वाजले असतील. म्हातारीला चहा पाजला. तिच्या सुजलेल्या पायांची मालीश केली. व रात्रभर तिच्या जवळ च राहिलें.

## दु:खितांची सेवा ही च खरी यात्रा

मैत्रिणी नाराज झाल्याचा उल्लेख वर आला च आहे. म्हातारीच्या सेवेंत लागल्यामुळें आपल्या यात्रेचा कार्यक्रम लांबेल असें त्यांना वाटत होतें. मीं नम्रतापूर्वक त्यांना सांगितलें 'नाराज होऊं नका. आपली यात्रा म्हणजे केवळ हिमालयाची यात्रा नाहीं; तर त्याहून मोठी अशी जीवन-यात्रा आहे. जीवन-यात्रेंत अनेक अडचणींना व संकटांना तोंड द्यावें लागतें. कर्तव्य-पालन करीत असतां आलेल्या अडचणींना तोंड दिल्यानें च यात्रा पूर्ण होते. अडचणींपेक्षां कर्तव्य-पालनाचें महत्त्व फार जास्त आहे.'

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ५॥ वाजतां निघून मैत्रिणींसह धरासू चट्टीला पोंचलें. ही चट्टी गंगाकाठीं आहे. येथें एक पहाडी नाला गंगेस मिळतो. ह्या चट्टीजवळून गंगोत्रीला जाण्याचा ४७ मैल लांब रस्ता आहे. येथें दुकान, धर्मशाळा वगैरे सोयी हि आहेत. स्नान, भोजन व विश्राम करून आम्ही जम्नोत्रीच्या रस्त्याला लागलों.

## माझी कठिण दशा

धरासूहून सहा मैल असलेली सिलक्यार चट्टी रात्रीं ७ वाजतां गांठली. आदल्या दिवशीं म्हातारीचें वजनदार सामान उचलल्यामुळें आज माझी प्रकृति फार बिघडली होती. रक्तस्राव

इतका जास्त होऊं लागला की मी जवळ जवळ बेशुद्ध च झालें होतें. बसू शकत नव्हतें; उठू हि शकत नव्हतें हातापायांत कांहीं चेतना च उरली नव्हती. शरीरांत कांहीं रक्त च उरलें नाहीं असें मला वाटत होतें. बरा च वेळ मी निश्चेष्ट पडलें होतें. माझ्या सर्व मैत्रिणी झोपल्या होत्या. कांहीं वेळानें मी शुद्धीवर आलें. जगणें असंभव वाटूं लागलें. स्वतःच्या बाबतींत मृत्यूचें दुःख वाटत नव्हतें. पण यात्रेंत च माझा हि मृत्यु झाला तर मैत्रिणींना किती दुःख व त्रास होईल याचा विचार येऊन मानसिक वेदना फार च होऊं लागल्या. तेव्हां मीं मैत्रिणींना हळूं च हांक मारून उठविलें. थोडचा वेळानें माझी वाचा च बंद होत आहे असें मला वाटलें. माझी ही कठिण स्थिति पाहून मैत्रिणी फार घाबरल्या. त्या किंकर्तव्यमूढ झाल्या. तेथें औषधोपचार करण्याची कांहीं सोय नव्हती. कशी तरी रात्र निभली. प्रकृति सुधारण्याचा रंग दिसत नव्हता.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं त्या च चट्टींत दुसऱ्या खोलींत राहणाऱ्या एका लखनौ निवासी दंपतीला एका मैत्रिणीनें सर्व परिस्थिति सांगितली. ते दोघे हि लगें च माझ्याकडे आले. त्यांनीं मला धीर दिला. उपचार म्हणून बेंबीवर कपडा गुंडाळून त्यावर थंड पाण्याची धार सोडण्यास सांगितलें. त्यामुळें कांहीं वेळानें मला बरें वाटूं लागलें. हळूं हळू स्राव कमी झाला.

आपल्या जीवनाचा लवकर च शेंवट होण्याचा संभव आहे, अशा मनःस्थितींत असतांना मीं मैत्रिणींना येथपर्यंत सांगून टाकलें कीं 'माझी कांहीं चिंता करूं नका. मला मृत्यु आला तर अंत्यविधीसाठीं साधन-सामुग्री जुळविण्याच्या भानगडींत पडूं नका. माझें शव गंगा माउलीला अर्पण करा. व त्यानंतर यात्रा पूर्ण करण्याची तुमची हिंमत असेल तर पूर्ण करा.'

मला अशक्तता फार आली होती. त्यामुळें दोन दिवस आम्ही सर्व तेथें च राहिलों. अशा प्रकारें यात्रा अधिक लांबविणें मैत्रिणींच्या दृष्टीनें मला योग्य वाटलें नाहीं. अशा परवश अवस्थेंत यात्रा कशी करायची हा प्रश्न माझ्यासमोर होता. शेंवटीं, ज्या साधनाच्या विरुद्ध मी होतें त्याचा च उपयोग मला करावा लागला. ज्या 'कंडी' चें नांव देखील मला असह्य होतें तिच्यांत असहाय अवस्थेमुळें मला बसावें लागलें. हृदय कठिण करून मोठ्या मुष्किलीनें तीन दिवस अशा प्रकारें यात्रा केली. कंडींत बसलें असतां केव्हां केव्हां मला फार च दु:ख होई व माझ्या तोंडून उद्गार निघत 'अरे बाबा, मला खालीं उतरूं दे. मला अशा प्रकारें माणसावर बसणें बरें वाटत नाहीं. त्यावर कंडीवाला म्हणे 'ताई, असें म्हणूं नका. गरिबांवर दया करा. तुम्ही असें कराल तर माझें पोट कसें भरेल ?" मी त्याला उत्तर देई, "तूं पोटाची चिंता करूं नकोस. तुला ठरलेले पैसे मिळतील च. तुझ्या पाठीवर बसणें मला बरें वाटत नाहीं. म्हणून मीं खालीं उतरूं दे म्हटलें.' असें म्हणून मी खालीं उतरत असे. मनोबळ तर होतें, पण शरीरबळ ? जास्त दूर चालूं शकत नव्हतें. त्यामुळें थोडा वेळ पुन्हां पुन्हां कंडींत बसावें लागे.

ह्या वेळीं कांहीं यात्रेकरू मला असे हि भेटले कीं जे माझी थट्टा करीत म्हणायचे 'ताई, हा कालच्या सेवेचा व परोपकाराचा प्रसाद आहे. तो आज तुम्हांला भोगावा लागत आहे.' मी म्हणत असे, 'हं ! हें त्याचें च फळ असेल तर मी तें आनंदानें सेवन करीन. असा त्रास मला फार आवडतो. हे कष्ट मला फार गोड लागतात. हा च माझ्या जीवनाचा आधार आहे. ह्यांत च मला जीवनाचा आनंद लाभतो. आंधळ्याप्रमाणें तीर्थ-स्थानांची केवळ

पायपीट करणें व शरीर सुकविणें हा कांहीं यात्रेचा उद्देश नाहीं, सत्पुरुष अशा यात्रेला यात्रा म्हणण्याऐवजीं यातना म्हणतात. सर्व सुख-दु:खें आनंदानें सोसून सहज-प्राप्त सेवा केल्यानें च यात्रेचें खरें फळ पदरांत पडतें. अशा प्रकारें दु:ख सोसल्यामुळें मरण आलें तरी त्यामुळें माझें कांहीं बिघडणार नाहीं. मी अशा मरणाचें स्वागत च करीन. मी असें कोणतें पुण्य केलें आहे ? मी तर निमित्तमात्र होतें.

कांहीं वेळ कंडींत कांहीं वेळ पायीं, अशा रीतीनें गंगाणी चट्टीपर्यंत मी गेलें.

**गंगाणी चट्टी**

ही चट्टी गंगाकांठीं आहे. येथें कालीकमलीवाल्यांची धर्मशाळा व सदावर्त आहे. मीं येथें स्नान, भोजन वगैरे केलें व थोडा वेळ आराम करून जानकी-चट्टीकडे जाऊं लागलें. मैत्रिणी तोंवर जम्नोत्रीला पोंचल्या होत्या. कंडीमुळें मी मागें पडलें होतें. जानकी-चट्टींत मीं थोडी विश्रांति घेतली. कंडीवाल्यानें हि जेवण केलें. येथून निघून सायंकाळीं पांचच्या सुमारास मीं जम्नोत्री गांठली. तेथें मैत्रीणींबरोबर जेवण केलें, व निसर्ग-सौंदर्य पाहण्यास निघालों.

**जम्नोत्री**

येथें अनेक प्रवाह मिळून यमुना नदी बनते. कांहीं प्रवाहांचें पाणी इतकें कढत असतें कीं तांदूळ, डाळ, बटाटे वगैरे कपडयांत बांधून कांहीं वेळ त्यांत बुडवून ठेवले तर उत्तम शिजतात. यमुनेचा उगम वानर-पुच्छ पर्वताच्या तिसऱ्या शिखरापासून होतो असें सांगतात. हें स्थान सुमेरु पर्वताला भिडलेलें आहे. असें हि सांगतात कीं बंदरपुच्छ पर्वतापासून १४ मैलांवर कैलासचा पायथा आहे. बर्फ फार असल्यामुळें तेथें कोणी हि जाऊं शकत नाहीं.

जम्नोत्री हें एक थंड ठिकाण आहे. येथें एक यमुनामंदिर आहे. यात्रेकरूंसाठीं दोन तीन धर्मशाळा आहेत. येथील प्राकृतिक दृश्य अद्वितीय आहे. तें पाहून परमेश्वराच्या सगुण रूपाची कल्पना येते. हिमाच्छादित पर्वतावर जेव्हां सूर्य-प्रकाश पडतो तेव्हां तो स्फटिकमण्याप्रमाणें चमकू लागतो. ह्या पर्वतांतून च यमुनेचा उगम होतो. तो फार सुंदर आहे. येथें यमुनेचें पाणी निळसर रंगाचें आहे.

येथें गरम पाण्याचे तीन चार झरे आहेत. त्यांचें पाणी अगदीं उकळतें असतें. या ठिकाणीं थोडा वेळ बसलें तरी अंगांतून खूप घामाच्या धारा वाहूं लागतात, व चालण्यामुळें आलेला थकवा नाहींसा होतो. एका कुंडांतील पाणी इतपत च गरम आहे कीं त्यांत आरामानें बसून स्नान करतां येते. येथें स्नान केल्यावर माझ्या मनांत विचार आला कीं प्रकृति-माता ही च खरोखर आपली माता आहे. ती वृक्षरूपी हिरव्या वेलबुट्टीची साडी नेसून यात्रेकरूंचें रूप घेऊन आलेल्या मुलांचें स्वागत करीत आहे; व त्यांचा थकवा नाहींसा व्हावा म्हणून त्यांना स्नानादीसाठीं तापविलेलें पाणी देत आहे. प्रकृतिमातेच्या या सहवासांत आम्ही एक दिवस राहिलों.

येथें एका सज्जन यात्रेकरूंशीं भेट झाली. ते काँग्रेस-कार्यकर्ते होते. विवेकशील व विरागी दिसत होते. त्यांचें नांव चिंतामणीभाई. राहणारे आलमोड्याचे. स्वयंसेवकासारखी एक बगल थैली ते वापरीत असत. त्यांत च त्यांचें सर्व सामान राही. खादीचा एक सदरा, टोपी, निरुंद पन्ट्याचीं दोन धोतरें व एक घोंगडी इतकें च कपडे घेऊन हे महापुरुष ह्या थंड मुलुखाची यात्रा करण्यास निघाले होते. पायांत पादत्राण हि नव्हतें. ह्या भागांत अनवाणी यात्रा

करणारे हे च एक भेटले. ह्यांच्यांत त्याग व सेवावृत्ति खूप दिसत होती. आम्ही कांहीं दिवस बरोबर यात्रा केल्यामुळें त्यांचा परिचय बरा च झाला.

दुसऱ्या दिवशीं यमुना मातेचा आशीर्वाद घेऊन आम्ही निघालों व ह्या थंड मुलुखांतून पायीं प्रवास करीत दहा दिवसांनीं उत्तरकाशीला पोंचलों.

### उत्तरकाशी

येथें गंगेचा घाट अर्धवट पक्का बांधलेला आहे. वस्ती साधारण च आहे. तीन चार दुकानें आहेत. कालीकमलीवाल्यांची धर्मशाळा व सदावर्त आहे. एक आयुर्वेदी दवाखाना, पोस्ट ऑफिस, व पोलीस ठाणें हि आहे. ह्या रस्त्यावर केदारनाथ व उत्तरकाशी हीं दोन च पोस्टाचीं ठिकाणें आहेत. येथें महादेवाचें (विश्वनाथाचें) एक जुनें मंदिर आहे. दुर्योधनानें पांडवांचा नाश करण्यासाठीं जें लाक्षागृह बनविलें होतें त्याचें स्थान येथून जवळ आहे असें सांगतात. प्रत्येक सोमवती अमावास्येला गंगा-स्नान व श्राद्ध करण्यासाठीं दूर दूरचे अनेक लोक येथें येतात. एक दिवस येथें राहून दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्रार्थना करून आम्ही निघालों व अकरा वाजेपर्यंत मुनेज चट्टीला पोंचलों.

५८८४

### मुनेज चट्टी

ही चट्टी गंगाकाठीं आहे. दूध स्वस्त मिळाल्यामुळें आम्ही खीर करून खाल्ली. दोन तास विश्रांति घेऊन पुढें निघालों. थोडें दूर जातों न जातों तों च पाऊस सुरू झाला. सर्व कपडे भिजले. रस्त्यांतील एका दुकानांत रात्र काढली. दुसऱ्या दिवशीं पहाटें निघून गंगाणी चट्टी गांठली.

**गंगाणी चट्टी**

येथें यात्रेकरूंना बरा च आराम मिळूं शकतो. सडकेजवळ च ४०-५० फूट उंचीवरून एक झरा खालीं पडतो. जवळ च गंगेचा पूल ओलांडला कीं ऋषिकुंड आहे. त्यांतील पाणी कढत असतें. त्यांत स्नान केल्यानें चर्मरोग बरे होतात अशी वदंता आहे. ह्या कुंडाकडे जाणाऱ्या रस्त्यानें एकदम चढण व एकदम उतरण आहे. येथें कपडे धुऊन आम्हीं मनसोक्त स्नान केलें. ह्या साऱ्या यात्रेंत अशा प्रकारचें स्नान, आम्हांला तरी, दुसऱ्या कोणत्या ठिकाणीं लाभलें नाहीं. नंतर धर्मशाळेंत स्वयंपाक सुरू केला. पण इंद्र-देवाच्या कृपाप्रसादामुळें सर्पण ओलें झालें. अर्धवट शिजलेल्या अन्नाची च आहुति जठराग्नीला दिली. सायंकाळीं साडे चार वाजतां पुढें चालू लागलों.

निघतांना एका माणसानें पुढील मुक्कामाचें ठिकाण चार मैल आहे असें आम्हांला सांगितलें होते. पण तें प्रत्यक्षांत सहा मैल निघालें. रस्ता चढणीचा होता. रस्त्यांत च सायंकाळ झाली व जोरदार पाऊस हि सुरू झाला. मोठ्या मुष्किलीनें रात्रीं ९॥ वाजतां आम्ही मुक्कामावर पोंचलों. कपडे बदलून कशी तरी रात्र काढली. दुसऱ्या दिवशीं प्रातर्विधि आटोपून तीन मैलांवरील सुक्खी चट्टी गांठली. येथें थोडा फराळ करून पुढें निघालों व दुपारचें जेवण झाला चट्टीला करून सायंकाळीं हरिशल चट्टीला गेलो.

**हरिशल चट्टी**

हें स्थान फार रमणीय आहे. तिब्बती लोक येथें बरे च आहेत. गुप्त-गंगा, हरिगंगा, व नीलगंगा हे तीन प्रवाह येथें गंगेला मिळतात म्हणून च या स्थानाला श्यामप्रयाग हि म्हणतात. येथें

लक्ष्मीनारायणाचें एक सुदंर मंदिर आहे. धराली चट्टी येथून तीन मैल आहे.

**धराली चट्टी**

येथें गंगा नदीच्या तीन धारा झाल्या आहेत. एक पक्का घाट आहे. तिबेटी व मुलतानी लोक मजुरीसाठीं व व्यापारासाठीं घोंगडी, मृगचर्म वगैरे सामान गाढवांवर किंवा खेचरांवर लादून येथें आणतात व दुकानदारांना विकतात. ह्या लोकांचे बहुधा तांडे असतात. कैलास व मानस सरोवराला जाण्याचा एक रस्ता येथून हि आहे असें सांगतात. येथें रात्रभर थांबून सकाळीं तीन मैलांवरील भैरव चट्टी गांठली.

**भैरव चट्टी**

रस्ता फार च चढणीचा होता. ह्या चट्टीच्या चारी बाजूंना देवदारूचे मोठमोठे वृक्ष खूप आहेत. त्यांनीं जणूं हे स्थान घेरलें च आहे. त्यामुळें हें ठिकाण फार शांतिदायक वाटतें. येथें एक भैरव मंदिर आहे. गंगा फार खालीं असल्यामुळें पाण्याचा बरा च त्रास होतो. दुपारचें जेवण करून आम्ही पुढें निघालों. व सायंकाळीं गंगोत्रीला पोंचलों.

**गंगोत्री**

हें स्थान अत्यंत सुंदर आहे. येथें गंगा-मंदिर आहे. त्यांत गंगेच्या सुवर्णजडित मूर्तीजवळ च यमुना, सरस्वति, भागिरथी व शंकराचार्यजींच्या मूर्ति आहेत. ह्या मूर्तींना यात्रेकरू स्पर्श करूं शकत नाहीत. दुरून च दर्शन करावें लागतें. मंदिरासमोर विस्तीर्ण मैदान आहे. त्याच्या चार दिशांना पर्वतांची हिमाच्छादित शिखरें आहेत. जणूं एक शृंगमाला च. ह्या शिखरांमधून गंगेचा प्रवाह वाहतो.

पहाडाच्या खालच्या बाजूस चीड व देवदारचे मोठमोठे वृक्ष ताठ उभे आहेत. त्यामुळें निसर्ग-सौंदर्यात विचित्र भर पडली आहे. येथें थंडी फार असते. बाबा कालीकमलीवाल्यांची धर्मशाळा व सदावंत आहे. त्यामुळें यात्रेकरूंची सोय चांगली होते. वस्तींत आणखी हि अनेक धर्मशाळा आहेत. खाद्यपदार्थ बाजारांत मिळा-तात; पण इतके महाग कीं कांहीं सांगू शकत नाहीं. येथें सामान आणतांना जो त्रास पडतो तो लक्षांत घेतां ही महागाई स्वाभाविक च म्हटली पाहिजे.

**गोमुख-यात्रेची प्रेरणा**

येथें पोंचतां च एक कन्नड प्रांतीय संन्यासी भेटले. त्यांनीं कालीकमलीवाल्यांशीं आमचा परिचय करून दिला. स्नान, देवदर्शन, भोजन इत्यादि आटोपून गप्पागोष्टी करीत असतां कळलें कीं हे सन्यासी गंगेच्या उगमस्थानाची, गोमुखाची, हि यात्रा करणार आहेत. आम्ही हि त्यांच्याबरोबर गोमुखची यात्रा करण्याची इच्छा दर्शविली. त्याबरोबर सर्वांनीं फार विरोध केला. ते भीति दाखवीत म्हणाले, ‘तेथें जाणें कांहीं खेळ नाहीं. रस्ता फार कठिण आहे. सामान्यतः तेथें कोणी हि यात्रेकरू जात नाहीं. तुम्ही तर तेथें जाऊं च शकणार नाहीं. पण ह्या सर्व भेडसावणाऱ्या गोष्टी ऐकून आमचा उत्साह कमी होण्याऐवजी उलट वाढला आणि त्याच्या जोडीला कुतूहल उत्पन्न झालें. आमचा निश्चय अजून हि दृढ आहे हें पाहून ते म्हणाले, ‘आम्हीं आपले कर्तव्य केलें; आतां तुमचें तुम्ही पहा. पण तुम्ही ही यात्रा करणार च असाल तर बरोबर कुली व हातांत काठी जरूर ठेवा.’ आम्हीं उत्तर दिलें. ‘आतांपर्यंत आम्ही बरोबर कुली किंवा काठी हि ठेवली नाहीं; एकमात्र ईश्वराचा च आधार होता. व पुढे हि तो च राहील.”

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 2-197 वि: ...
नोंद दि: ...

**गोमुखची भयानक वाट**

गोमुखच्या यात्रेंत, [illegible]मुळें व इतर अडचणींमुळें, रस्त्यांत स्वयंपाक करणें शक्य नव्हतें. म्हणून चुरमा करून बरोबर घेतला. श्री. चिंतामणीभाई व करणाटकी स्वामी बरोबर होते. रस्ता बिकट होता. एका बाजूला उंच पर्वत व दुसऱ्या बाजूला फार खोलांत वाहणारा गंगेचा जोरदार प्रवाह. ह्या प्रवाहाकडे पाहतां च चक्कर येते. कोठें कोठें तर पायवाटेवरील पुसट पदचिह्नें हि दिसत नसत. काठीनें किंवा दुसऱ्या कोणत्या तरी साधनानें पहाडाची माती खणून पाय ठेवण्यापुरती जागा करावी लागे. अशा खणलेल्या जागेवर पाय ठेवायचा, गंगेत पडू ह्या भीतीनें पहाडाच्या बाजूला झुकायचें, व दोन हि हातांनीं पर्वताचा आधार घेऊन दुसरें पाऊल पुढें टाकायचें, असें कित्येकदां करावें लागे. नेहमी मस्तक तळहातावर घेऊन चालावें लागे. पाय ठेवण्यासाठीं खणून तयार केलेली जागा हि वरून सरकणाऱ्या रेतीमुळें दोन तीन मिनिटांत भरून जाई. ह्यामुळें च ही यात्रा फार कठिण आहे. बहुधा थोडेसे यात्रेकरू एकत्र च जातात.

ही एक च अडचण नाहीं. कांहीं कांहीं ठिकाणीं तर पर्वत-शिखरावरून मोठे मोठे दगड घसरून खालीं गंगेंत पडतात. ह्या दगडांमुळें यात्रेकरूंना हि दगा होण्याचा संभव असतो. यात्रेकरूंना दुहेरी दक्षता बाळगावी लागते. एका बाजूला वरून घसरत येणाऱ्या दगडांपासून बचावणें, व दुसऱ्या बाजूला स्वत:चा पाय घसरून खालीं गंगेंत देह समर्पण होऊं नये म्हणून तोल संभाळणें. ह्या भयानक मार्गाचें यथार्थ वर्णन करणें मला शक्य नाहीं. ह्याच्या तोडीचें उदाहरण बहुधा दुसरें नसेल. ह्या वर्णनांत अतिशयोक्ति मुळीं च नाहीं. फक्त वस्तु-स्थिति वर्णिली आहे.

साहसी, निर्भय, व शिर तळहातावर घेऊन निघालेली माणसें च ही यात्रा करूं शकतात. ते च ह्या गोमुख-यात्रेचा दैवी आनंद अनुभवूं शकतात. शरीराचा मोह राखणाऱ्या, सांसारिक, चिंताग्रस्त, पुरुषांच्या दृष्टीनें हें यम-द्वार च आहे. भित्र्या माणसाला हा रस्ता अधिक च भयानक वाटतो. निर्भय यात्रेकरूंना मात्र ह्या ठिकाणचें नैसर्गिक दृश्य आनंददायी असतें. कुठें उंच उडी मारून' कुठें बसून, कुठें लांब उडी मारून, व कुठें जीव धोक्यांत टाकून पावलें टाकण्यांत हि एक प्रकारचा दैवी आनंद अनुभवास येतो.

रस्ता कठिण असल्यामुळें च गो-मुख यात्रेला इतकें महत्त्व लाभलें आहे. यात्रेसंबंधीची विशेष भावना व निर्भयता ह्या दोन कारणांमुळें आम्हांला ह्या सर्व अडचणींत अधिकाधिक आनंद च वाटत होता. प्रत्यक्ष गोमुखला पोंचल्यावर जो आनंद झाला त्या पेक्षां किती तरी जास्त आनंद ह्या रस्त्यांत च आम्हांला लाभला. जे यात्रेकरू संकुचित भावनेनें, गोमुख दर्शनानें स्वर्ग लाभेल या भावनेनें, ही यात्रा करतात त्यांना येथें स्वर्ग लाभत नाहीं. त्यांचा स्वर्ग कोठें तरी दुसरीकडे असतो. पण आम्हांला तर प्रत्येक ठिकाण स्वर्ग च होतें. प्रत्येक ठिकाणीं परमेश्वराच्या विराट स्वरूपाचें च दर्शन होत होतें. वर पाहिलें कीं उंच च उंच, गगन-चुंबी मोठाले पर्वत व खालीं पाहिलें कीं कुठें उसळणारी, कुठें खळखळ धावणारी, कुठे शांत, तर कुठें क्रुद्ध व फेसाळलेली, कुठें गवतांत लपलेली, तर कुठें हळूं हळूं वाहणारी गंगामाता. ती विचित्र पहाट, ती मध्याह्नाची वेळ, ती सायंकाळ व ती अंधारी रात्र ! कुठें जणूं आकाशाला उचलून धरणारे उंच च उंच वृक्ष व त्यांवर बसून परमात्म्याचें गुणगान करणारे रंगीबेरंगी अपरिचित पक्षी, सूर्य नारायण व मेघराज यांच्या लपंडावाच्या खेळामुळें क्षणोक्षणीं

बदलणारे नैसर्गिक देखावे व ह्या सर्व प्राकृतिक दृश्यामागें असलेल्या सूत्रधार परमात्म्याचें तत्त्व, आमचें मन प्रतिक्षणीं आपल्याकडें वेधत होतें. अठरा मैलांचा हा रस्ता तीन दिवसांत आम्हीं आक्रमिला. रोज दहा बारा तास आम्ही चालत असूं. रस्त्यांत जेथें कोठें बसण्याजोगी जागा मिळे तेथें थोडा वेळ विश्रांति घेत असूं; चुरमा खात असूं, अंधार पडला कीं कुठें तरी जागा पाहून झोपत असूं. थंडी व जंगली जनावरें यांना टाळण्यासाठीं लाकडें व पानें गोळा करून शेकोटी पेटवीत असूं. हे तीन दिवस जन्मभर विसरणें शक्य नाहीं. मी तर केव्हां केव्हां निसर्गांत मग्न होऊन जाई. शारीरिक कष्टांचा विचार मनांत येत नसे. बर्फावरून चालल्यामुळें पाय फाटत; पण त्यांतून वाहणारें रक्त बर्फाच्या थंडपणामुळें लगे च गोठून जाई. त्या वेळच्या परिस्थितीची कल्पना केल्यानें आज अंगावर काटा उभा राहतो परंतु त्या वेळीं आम्हांला भीति शिवत हि नव्हती. आम्ही त्या वेळी कांहींशी देहातीत अवस्था च अनुभवीत होतों. अशा प्रकारें तीन दिवस प्रवास करून चौथ्या दिवशीं आम्ही गंगेच्या उगमस्थानीं गोमुखला पोंचलों. गोमुख पाहून आम्हांला एक प्रकारची शांति लाभली.

गंगेचा उगम गोमुख-धारा-पर्वतांतून होतो. येथें बर्फ इतका जास्त असतो कीं कार्तिक ते आषाढ नऊ महिने कोणी येथें जाऊं शकत नाहीं. श्रावण, भाद्रपद व अश्विन ह्या तीन महिन्यांत आणि साहसी यात्रेकरू च मोठ्या कष्टानें जाऊं शकतात. गंगोत्रीला गंगेच्या आसपास बरेंच जंगल होतें. पण हें गोमुख अगदीं निर्जन व वृक्ष-लता-विहीन आहे.

गोमुखहून आम्ही सुरक्षित परत आलों हें पाहून गंगोत्रीच्या लोकांना फार आश्चर्य वाटलें. गांधीजींच्या अनुयायी असें संबोधून

त्यांनीं आम्हांला 'बहादुर' पदवी दिली गंगोत्रीला एक दिवस विश्रांति घेऊन आम्ही भैरवादि चट्ट्यांवर थांबत थांबत केदार-घाटला आलों.

**केदारघाट**

गंगोत्रीहून केदारनाथाला जाण्याचा आम्हीं संकल्प केला होता. त्याप्रमाणें आम्ही केदारघाटला पोंचलों. केदारघाटच्या रस्त्यानें आम्हांला फार त्रास झाला. आधीं च आम्ही बऱ्याच थकलों होतों. व ह्या रस्त्यानें १२ मैल चढण व तितकी च उतरण ! थोडें दूर गेलों न गेलों तों पाऊस सुरु झाला. चारी बाजूला धुकें पसरलें होतें. थंडीमुळें पाय चालेनात. पाऊस थांबल्यानंतर आम्ही पुढें चालू लागलों त्यावेळीं थंड हवेंत ओल्या कपडयानें चालणें फार दु:खद होत होतें. बाराच्या सुमारास गत्तुचट्टीवर स्नान भोजन करून आम्ही पुढें निघालों. थोडें दूर गेल्यावर पुन्हां पाऊस सुरू झाला. अशा स्थितींत पुढें जाणें आम्हांला उचित वाटलें नाहीं. त्या दिवशीं नाइलाजानें जवळच्या एका चट्टींत रहावें लागलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्रार्थना आदि आटोपून निघालों. थोडया वेळानें नऊ मैलांची एक डोंगरी चढण सुरू झाली. हिला पौआली चढण म्हणतात. चढण चढूं लागतां च जोरदार पाऊस सुरू झाला. सर्व कपडे ओले चिंब झाले. थंडीमुळें हातपाय गारठूं लागले. सर्व अंगभर फार वेदना होऊं लागल्या. म्हणून उठत बसत हळूं हळूं चालूं लागलों. शेवटीं एक छोटेसें दुकान लागलें. अंगणांत दुकानदार शेकोटी पेटवून शेकत होता. त्याच्या जवळ च शेकोटीसमोर जाऊन बसलों. चार-पांच मिनिटांत च हातापायांत चैतन्य संचरलें. मग उरलेले तीन मैल चढून त्रिगुणी नारायणला पोंचलों. त्रिगुणी नारायणाचें दर्शन करून पुढें निघालों. तेव्हां गौरीकुंड लागलें.

## गौरी-कुंड

ह्या कुंडाच्या पाण्याचा रंग पिवळा, स्पर्श थंड, व स्वाद कांहींसा खारट होता. गंधकाचा वास येत होता. येथें शंकर-पार्वतीची व राधाकृष्णाची देवळें आहेत. ४०-५० हातांवर एक तप्त-कुंड हि आहे. त्याचें पाणी खूप उष्ण असतें. ह्या कुंडांत यथेच्छ स्नान केल्यामुळें आम्ही ताजे तवाने झालों.

हें एक छोटेसें गांव आहे. येथें बाबा कालीकमलीवाले यांची धर्मशाळा व सदावर्त आहे. भोजनानंतर निघण्याचा विचार होता. इतक्यांत पाऊस सुरु झाला. म्हणून रात्रीं तेथें च थांबून दुसऱ्या दिवशीं सकाळीं तीन मैलांवरील जंगल चट्टी गांठली.

जंगल चट्टीला थोडा फराळ करून रामवाडा आदि उतारे ओलांडून नऊच्या सुमारास आम्ही प्रसिद्ध केदारनाथधामला पोंचलों.

## केदारनाथ

येथें येतां च पंडे लोग आमच्या मागें लागले; व अनेक प्रकारचे प्रश्न विचारूं लागले. परंतु त्यांच्या भानगडींत न पडतां आम्ही सरळ कालीकमलीवाल्या बाबाजींकडे गेलों. त्यांनीं आमच्या राहण्याची व खाण्यापिण्याची व्यवस्था केली. स्नान करून आम्ही देवदर्शनास निघालों.

येथें केदारनाथाची मूर्ति नाहीं. एका भव्य शीलेचें च पूजन होतें. या मंदिराबद्दल अशी काहणी सांगतात की 'टोणग्याचें रूप घेऊन शंकर या पर्वतावर राहत फिरत असत. वनवासाच्या काळांत पांडुपुत्र भीमदादांनीं जंगली टोणगा समजून त्यांच्यावर गदा हाणली, तेव्हां त्याचा पुढचा भाग पर्वतांत घुसला. हा पुढचा भाग च केदारनाथ ह्या नांवानें प्रसिद्धीस आला. दुसरा भाग

भीमदादांनीं फेंकल्यामुळें नेपाळांत प्रकटला व तेथें पशुपति ह्या नांवाने सध्यां प्रसिद्ध आहे. शंकराचें हे रहस्य कळल्यानंतर, पांडवांनी त्या ठिकाणीं एक मंदिर बांधलें. पुढें शंकराचार्यांनी तें दुरुस्त केलें.'

या शीलेस महिषरूपधारी शंकराचें तुटलेलें मस्तक समजून दर्शनार्थी यात्रेकरू ताजें लोणी आणि तूप यांचा लेप लावतात. फुलें, पानें, गंध आदि वाहून केदारनाथाची पूजा करतात. देवळांत अंधार असल्यामुळें रात्रंदिवस तुपाचा अखंड दिवा तेवत असतो.

केदारनाथजींच्या दर्शनास जाण्यापूर्वीं यात्रेकरू मंदाकिनी गंगा व सरस्वती यांच्या संगमावर स्नान करतात. हा संगम मंदिराजवळ च आहे. येथें थंडी इतकी जोरदार असतें कीं स्नान करणें कांहीं सोपें काम नाहीं. हात पाय धुतांना च इतक्या वेदना होतात कीं जणूं कांहीं शरीरांतील रक्त च गोठलें आहे. दिवसभर थंडीची हुडहुडी अंगांत भरलेली असते. देवदर्शन घेऊन आम्ही धर्मशाळेंत परत आलों.

केदारनाथची वस्ती सुमारें २०० घरांची आहे. दुकानांत सामान्यत: सर्व आवश्यक वस्तु मिळतात. पण फार महाग असतात. बाबा कालीकमलीवाले यांची धर्मशाळा व सदावर्त सोडून इतर हि अनेक धर्मशाळा व सदावर्तें आहेत. बाबा कालीकमलीवाले यांचें एक औषधालय हि आहे. तेथें गोरगरिबांना औषध फुकट मिळतें. येथे पोष्ट ऑफिस व तार-घर हि आहे.

केदारनाथ गांवाच्या चारी बाजूला लांब च लांब मैदान आहे. नदीपलीकडे बर्फाच्छादित पर्वतांची रांग च रांग आहे. ती फार सुंदर दिसते. येथें पावसाच्या झडीसारखी बारीक बारीक

हिमतुषारांची झड लागते. हिम-बिंदूंचा जमिनीवर पडलेला ढीग मोत्यांच्या ढिगासारखा दिसतो. ढग इतके दाट असतात कीं सूर्यदर्शन होणें कठिण. थंडी फार असल्यामुळें यात्रेकरू रात्रीं येथें राहत नाहींत. दिवसा च जिथें इतकी थंडी तिथें रात्रीं किती असेल ! रात्रीं बर्फाचें वादळ इतकें जोरदार असतें कीं साहसी मनुष्याच्या नाड्या हि थंड पडतात. किती हि पांघरूण घेतलें तरी कमी च वाटतें. येथील प्राकृतिक दृश्य पाहण्यांत आमचा सर्व दिवस गेला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठच्या सुमारास आम्ही बदरीनारायणाला जाण्यास निघालों. रस्त्यांत चमोली, गरुडगंगा, पांडकेश्वर, गुप्तकाशी आदि अनेक चट्टीांवर थांबत थांबत आम्ही बदरीनारायणाला पोंचलों.

**बदरीनाथ**

हें स्थान मंदराचल पर्वताच्या डाव्या बाजूस अलकनंदा नदीच्या कांठीं वसलें आहे. सुमारे तीनशें घरें आहेत. बाजार बरा च चांगला आहे. सर्व भोजनसामग्री व घोंगड्या वगैरे येथें मिळतात. दूध, दही, बारा आणे शेर असतें. येथें बऱ्या च धर्मशाळा व अन्न-छत्रें आहेत. रोज कोणी ना कोणी धर्मात्मा बुभुक्षित गरिबांना भोजन घालतो. बाबा कालीकमलीवाले यांची धर्मशाळा, सदावर्त, अन्नछत्र, औषधालय सर्व कांहीं येथें आहे. बदरीनाथाच्या जयजयकाराचा ध्वनि वातावरणांत सारखा दुमदुमत असतो.

बदरीनाथाला पोंचतां च आम्ही सरळ बाबा कालीकमलीवाले यांच्या धर्मशाळेंत गेलों. बैठकींत यात्रेकरूंची गर्दी होती. मोठ्या मुष्किलीनें रस्ता करून मुख्य व्यवस्थापक असलेल्या स्वामीजींपर्यंत पोंचलों व नमस्कार केला. त्यांनीं विचारल्यावर

स्वत:ची ओळख करून दिली. स्वामीजींनीं राहण्यासाठीं स्वतंत्र घर दिलें व भोजनाची हि चांगली व्यवस्था केली

**पंडयांच्या तावडींतून सुटका**

घरांत आपलें सामान ठेवून आम्ही स्नान करण्यासाठीं तप्त कुंडावर गेलो. पंडे लोक संकल्प केल्याखेरीज, दक्षिणा दिल्या खेरीज, स्नान करूं देईनात. ते म्हणू लागले 'पुण्य-क्षेत्रांत संकल्प वगैरे न करतां स्नान केल्यास फार पाप लागतें. आम्हीं हंसून म्हटलें 'आम्हीं तर यात्रा सुरू करण्यापूर्वीं च संकल्प केला आहे. आतां त्याची कांहीं गरज नाहीं.' हें ऐकून ते संतापले व म्हणाले "तुम्ही केवळ चैन करण्याकरतां फिरायला आला आहांत असें दिसते. अशा प्रकारें स्नान केल्यास तुम्हांला पुण्य लागणार नाहीं." आम्हीं गंभीरपणें उत्तर दिलें, "पुण्य मिळविणें हा आमच्या यात्रेचा उद्देश नाहीं. प्रकृतिमातेच्या निरीक्षणासाठीं आम्ही आलों आहों. पंडे म्हणाले "गांधींचें सर्व च लोक असे नास्तिक दिसतात, त्यांना धर्म नाहीं कीं कर्म नाहीं. हा काळ च विपरीत आहे." त्यांना समजावण्याचा प्रयत्न करीत आम्हीं म्हटलें 'गांधीजी धर्माविरुद्ध नाहींत. ते तर धर्माच्या नांवावर जे अनुचित रीतिरिवाज चालू आहेत त्यांचा नाश करून खऱ्या धर्माचा प्रचार करूं इच्छितात." अखेर युक्तिवादानें आपण जिकूं शकत नाहीं असें पाहून ते म्हणाले, "संकल्प केल्याखेरीज आम्ही तुम्हांला मंदिरांत प्रवेश करूं देणार नाहीं. व गंगास्नान हि करूं देणार नाहीं." आम्हीं म्हटलें "मंदिरांत न गेलों तरी आमचें कांहीं बिघडत नाहीं. साऱ्या जगाला आपल्या दिव्य दर्शनानें आनंदित करणारी प्रकृतिमाता हजारो मूर्तींच्या रूपांत आपल्या सर्वांसमोर उभी आहे. मंदिरांत देखील अशा च मूर्ति आहेत. आंत जाऊं दिलेत किंवा जाऊं न दिलेत

तरी आम्हांला त्याची पर्वा नाहीं. मंदिराचा दरवाजा तुमच्या हातांत आहे. त्यांतून प्रवेश करण्यास तुम्ही आम्हांला मनाई करूं शकतां. पण गंगेचा ओघ तर सर्वांना मोकळा आहे. तो तुम्ही मंदिराच्या आवारांत बंद करूं शकत नाहीं."

इतक्यांत एक गृहस्थ आला व पंड्यांना म्हणाला "हे पहा, रावळजींची (बद्रीनाथच्या मुख्य पुजाऱ्याला 'रावळ' म्हणतात; त्यांचा फार मान राखतात; शंकराचार्यांच्या गादीचे अधिकारी असलेले ते दक्षिणी ब्राह्मण आहेत.) आज्ञा आहे कीं ह्या मुलींना कोठें हि मनाई करूं नका. त्यांची इच्छा असेल तेथें जाऊं द्या.' अशा प्रकारें आम्ही पंड्यांच्या त्रासांतून अचानकपणें सुटलों.

**गरीब आणि भाविक यात्रेकरूंचे पंड्याकडून हाल**

ह्या च वेळीं एक गरीब यात्रेकरू त्या च ठिकाणीं स्नान करण्यासाठीं कुंडांत उतरला. लगेच एका पंड्यानें त्याला रोकले. व संकल्प केल्यानंतर च स्नान करण्याची परवानगी दिली. पंड्या खालीलप्रमाणें संकल्प म्हणू लागला. 'जंबूद्विपे, भरतखंडे, हिमालय प्रदेशे, गंगातीरे, महाक्षेत्रे, महापुण्यकाले, शुभतिथौ, शुभलग्ने, शुभवासरे, धर्मार्थकाममोक्ष-चतुर्विध-पुरुषार्थ-फलप्राप्त्यर्थम् सुदक्षिणायाः सुवर्णस्य वा दानमहं करिष्ये.'

ह्यानंतर यात्रेकरूंच्या हातांत संकल्प-जल ओतण्यांत आलें; व त्याला कुंडात उतरूं दिलें. त्यानें एक बुडी मारतां च हात पसरून पंड्या दक्षिणा मागूं लागला. त्या भाविक यात्रेकरूनें भीत भीत त्याच्या हातावर कांहीं पैसे ठेवले व नम्रपणें नमस्कार केला. दक्षिणा कमी आहे असें पाहतां च पैसे यात्रेकरूंच्या तोंडावर फेकून पंड्या म्हणाला 'दोन चार पैसे हातावर ठेवतां! मी कांहीं तुमच्याकडे भीक मागायला आलों नाहीं.' यात्रेकरू पंड्याला

नाराज करूं इच्छीत नव्हता. कारण तो नाराज झाला तर यात्रेचें सारें पुण्य वाया जाईल अशी त्याला भीति वाटत होती. पण करणार काय? जास्त पैसे च जवळ नव्हते. व्याकुळ होऊन दोन्ही हात जोडून तो पंड्याची प्रार्थना करूं लागला. 'अभाग्यावर दया करा. मी फार गरीब आहे. नाराज होऊं नका. आपल्या आशीर्वादानें च माझ्या मुलाबाळांचें कल्याण होईल. गरीबाची ही अल्पशी दक्षिणा च महान समजून मला आशीर्वाद द्या.' ह्या नम्र वचनांनीं हि त्या पाषाणाला पाझर फुटला नाहीं. उलट रागावून म्हणूं लागला; 'दक्षिणा देण्यास पैसे नाहींत तर यात्रा करायला कशाला निघालास ? रेल्वे, मोटार आदींचें भाडें दिलेंस कीं नाहीं ? काय घरीं उपाशी च राहत होतास? तुझ्या सांगण्यावर माझा विश्वास नाहीं. लवकर दक्षिणा दे.' यात्रेकरू गयावया करूं लागला. पण पैसे दिल्याशिवाय सुटका नव्हती. बरे च यात्रेकरू हा तमाशा पाहत होते.

हळूं हळू गर्दी जमली. आम्ही हे सर्व सहन करूं शकलों नाहीं. थोडे पुढें होऊन आम्ही पंड्याला विनोदानें म्हटलें 'ह्या बिचाऱ्याला कां सतावतां? तुम्ही दक्षिणा मागत आहां कीं जणूं जुनें कर्ज मागत आहां ? तुम्ही पुण्यक्षेत्रांत राहतां, मोठ्या मोठ्या वेदांताच्या गोष्टी सांगतां व अशा प्रकारचें ब्राह्मणाला न शोभणारें आचरण करतां ? जबरदस्तीनें दक्षिणा घेणें शास्त्रानें निषिद्ध मानलें आहे." पंड्या म्हणाला, "माईजी, कृपा करून तुम्ही मधें पडूं नका. हा आमचा उपजीविकेचा परंपरागत धंदा आहे. हा आम्ही सोडूं शकत नाहीं." आम्हीं म्हटलें, 'भाऊ, उपजीविकेचें हें साधन योग्य नाहीं. ह्या दक्षिणावृत्तीला आपल्या पवित्र जीवनाचा आधार मानण्यांत तुम्ही किती मोठी चूक करीत आहांत ह्याचा जरा

विचार तर करा! ह्या वृत्तीमुळें तुम्ही ब्राह्मणत्वाला च कलंक लावीत आहां. विचारांतीं तुम्हांला हा व्यवहार घृणास्पद वाटेल." आतां कांहीं उपाय नाहीं हें ओळखून पंडा क्षमा मागत म्हणाला, "यात्रेकरूंना त्रास देणें हा आमचा धर्म नाहीं हें कबूल. पण पोटासाठीं हें सर्व आम्हांला करावें लागतें."

ह्या नंतर आम्ही तप्त-कुंडांत स्नान केलें व बदरीनाथाचें दर्शन घेऊन बाबा कालीकमलीवाले यांच्या धर्मशाळेंत भोजन केलें. येथें असह्य थंडी होती. स्वामीजींनी पांघरण्यासाठीं आम्हांला १०-१५ घोंगड्या दिल्या होत्या. म्हणून थंडीचा त्रास विशेष झाला नाहीं. पण मनाला कोणतें पांघरूण घालणार? असहाय, वस्त्रहीन कुडकुडणाऱ्या गरिबांचें चित्र डोळ्यांसमोर सारखें उभे राही. त्यांना कपडे देण्याची धन-शक्ति आमच्याजवळ नव्हती. त्यांच्या प्रमाणें थंडी स्वेच्छा-पूर्वक सहन करण्याची आत्मशक्ति हि नव्हती, केवळ त्यांच्या दुःखानें आम्ही दुःखी मात्र होत होतों.

आम्ही कॉंग्रेसवाले असल्यामुळें कालीकमलीवाले स्वामीजी आमच्याशीं फार प्रेमानें वागत होते. आमची भोजनाची वगैरे फार चांगली व्यवस्था त्यांनीं केली. त्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों. आमच्यापैकीं दोघी जणी मलबारी आहेत हें कळतांच बदरीनारायणाच्या दक्षिणी ब्राह्मण पुजाऱ्यांना फार आनंद झाला. त्यांनीं आम्हांला रोज नैवेद्य प्रसाद वगैरे नेण्याचा आग्रह केला.

कालीकमलीवाले स्वामीजी व रावळजी यांच्या कृपेमुळें मंदिरांत येण्याजाण्याचें पूर्ण स्वातंत्र्य आम्हांला मिळालें. आम्ही वाटेल तितका वेळ व वाटेल तेव्हां मंदिरांत बसूं शकत होतों.

ह्या मंदिरांत नेहमीं फार गर्दी असते. यात्रेकरूला दहा मिनिटा-पेक्षां अधिक थांबूं देत नाहींत. व्यवस्था राखण्यासाठीं पोलीस हि असतात. हें मंदिर फार प्रेक्षणीय आहे. ह्याचें महाद्वार पूर्वेकडे आहे. सात आठ पायऱ्या चढल्यानंतर एक फाटक लागतें. तें उघडतांच समोर भगवंताची मूर्ति दिसूं लागते. हें दार उघडून ५०-६० यात्रेकरूंना आंत जाऊं देतात आणि मग फाटक बंद करतात. दर्शन घेऊन यात्रेकरू दक्षिण दरवाजानें बाहेर जातात. सर्व ठिकाणीं पोलीस असतात. पंड्यांप्रमाणें च त्यांना कांहीं 'दक्षिणा' दिली कीं दर्शन घेण्याची जास्त सोय होते!

ह्या मंदिरांत सकाळीं ८ व ९ च्या दरम्यान आरती होते. दहा वाजतां डाळ-भाताचा नैवेद्य होतो. एक वाजेपर्यंत फाटक उघडें असतें. चारच्या सुमारास मूर्तीचें दर्शन होतें. यात्रेकरू मूर्तीला हात लावूं शकत नाहींत. पांच हात अंतरावर उभें रहावें लागतें. अंधार असल्यामुळें मूर्तीजवळ नेहमीं तुपाचा नंदादीप तेवत असतो. मंदिराच्या दोन्ही बाजूंस इतर हि पुष्कळशा मूर्ति आहेत.

मंदिरासमोर च खालच्या बाजूस अलकनंदा नदी वाहत आहे. मंदिराजवळ च एका बाजूला तप्तकुंड आहे. हें कुंड औरस चौरस १५ हात असेल. ह्यांत बेंबीपर्यंत पाणी असतें. ह्यांत गरम पाण्याच्या दोन धारा पडतात. संध्या-तर्पण करणारांना बसण्यासाठीं कुंडाच्या चार हि बाजूला शिलासन बनलेले आहेत. येथून थोड्या अंतरावर ब्रह्मकपोला आहे. ह्या तीर्थांत पिंडदान केलें जातें. येथें श्राद्ध केल्यानें पितर ब्रह्म-लोकांत पोंचतात अशी समजूत आहे. मग त्यांचें वर्षश्राद्ध करण्याची गरज नसते.

येथून थोडें पुढें गेलें कीं मुचुकुंद-गुंफा लागते. तिबेट, कैलास व मानस सरोवराकडे जाणारे रस्ते तेथून फुटतात. बद्रीनाथहून कैलासला जाणाऱ्या यात्रेकरूंना जोशी-मठावरून जाणारा रस्ता सोईचा आहे असें सांगतात. मुचुकुंदहून तीन मैलांवर 'वसुधरा' आहे. रस्ता फार चढणीचा आहे. येथें सुमारें ३०० फुट उंचीचे दोन धबधबे आहेत. पाण्याचे तुषार हवेंत चारी बाजूला जेव्हां दवाप्रमाणें पसरतात व त्यांवर सूर्य-किरणें पडतात. तेव्हां इंद्र-धनुष्याचे सात हि रंग दिसूं लागतात. वसुधराचें पाणी फार थंड असतें. त्यांत स्नान करणें फार च कठिण आहे. म्हणून यात्रेकरू हातांत थोडें पाणी घेऊन अंगावर संमार्जन करतात.

वसुधराहून तीन मैलांवर सहस्रधारा आहे. व तेथून पुढें तीन मैलांवर चक्रतीर्थ आहे. तेथून पांच मैलांवर शतपथ तीर्थ आहे. तेथें बर्फ च बर्फ असल्यामुळें यात्रेकरू सामान्यत: जाऊं शकत नाहींत. तेथून आणखी पुढें गेलें म्हणजे जें स्थान लागतें त्याला पांडवांचें स्वर्गारोहण-स्थान म्हणतात.

बदरीनाथ गांवांच्या चार हि बाजूंस मैदान आहे. अलकनंदा व गंगा ह्या दोन नद्यांमुळें गांवचे दोन भाग पडतात. स्थान फार सुंदर व समुद्रसपाटीपासून १०४८० फूट उंच आहे. प्राकृतिक सौंदर्यामुळें ह्या पुण्यतीर्थाचें माहात्म्य अधिक च वाढलें आहे. येथें छोटासा बाजार आहे. बहुधा सर्व च वस्तु येथें मिळतात, पण महाग असतात. दूध-दह्याचा भाव बारा आणे शेर. बाबा काली कमलीवाले व इतर धार्मिक सज्जन येथें गरीब लोकांना रोज भोजन देतात. बहुधा यात्रेकरू तीन चार दिवसांपेक्षा अधिक थांबत नाहींत. कारण एक तर थंडी जास्त असते, व दुसरें खाण्याच्या वस्तु महाग मिळतात.

आम्ही काली कमलीवाल्यांच्या पाहुण्या असल्यामुळें आम्हांला कोणत्या च गोष्टीचा त्रास पडला नाहीं. आम्ही सात दिवस येथें राहिलों. कधीं कधीं पंडे लोक आम्हांला घरीं बोलावीत. एकदां एका पंड्याच्या घरीं त्याच्या विधवा बहिणीशीं आम्हीं चर्चा केली. तिनें आपलें दु:ख व आपल्यावर होणारे अत्याचार यांची हृदय-विदारक कहाणी आम्हांस आत्मीयतेनें सांगितली. हिंदु समाजाचें तें करुण चित्र आज देखील माझ्या डोळ्यांसमोर प्रत्यक्ष उभें आहे.

कालीकमलीवाल्या स्वामींमुळें येथें एका सव्वाशें वर्षें वयाच्या वृद्ध तपस्व्याचें आम्हांला दर्शन घडलें. ते वृद्ध तपस्वी एका गुंफेंत राहत असत. त्यांच्या आसनाजवळ च अनेक देव-देवतांच्या मूर्ति होत्या. आम्ही म. गांधींच्या आश्रमांत राहणाऱ्या आहोंत हें कळतां च ते तपस्वी बाभळीच्या प्रखर निखाऱ्याप्रमाणें लाल झाले. म. गांधींना अनेक अपशब्द बोलूं लागले. त्यांचा उग्र स्वभाव पाहून आम्हीं म्हटलें ‘आपण गीता वाचतां तसे म. गांधी हि वाचतात. पण दोघांमधें आम्हांला आकाश-पाताळाइतकें अंतर दिसतें. राजनैतिक नेता असून हि त्यांचें जीवन शांत व तपोमय आहे. उलट तपस्व्याला अनुकूल अशा एकांत व शांत वातावरणांत राहून हि आपण क्रोधानें भरलेले आहांत.” दुसऱ्या दिवशीं स्वामाजींनीं बर्फाच्छादित गुहेंत राहणाऱ्या एका देवीकडे आम्हांला नेलें. तिची तपश्चर्या पाहून आम्हांला सानंद आश्चर्य वाटलें.

ता. ६-७-३६ रोजीं सकाळीं स्वामीजींचा व इतर परिचित मंडळींचा निरोप घेऊन सकाळीं ८ वाजतां आम्हीं त्या पुण्य नगरीला नमस्कार केला व नैनीतालच्या मार्गानें परतलों.

बदरीनाथ ते चमोली ४७ मैल आम्ही ज्या मार्गानें गेलों होतों त्या च मार्गानें परत आलों. आठ तारखेस संध्याकाळीं आम्हीं चमोली चट्टीला पोंचलों. येथें रात्रभर राहिलों व सकाळीं दुकानदारांकडून आपलें सामान घेऊन पुढें निघालों. पांच मैल चालून नंदप्रयाग गांठलें.

**नंदप्रयाग**

येथें अलकनंदा व गंगा यांचा संगम आहे. संगमावर नंद व गोपालकृष्ण यांचीं मंदिरें आहेत. बाबा कालीकमलीवाले यांची धर्मशाळा व सदावर्त हि आहे. येथें आलमोड्याचे चिंतामणीभाई यांच्या गावच्या एका गृहस्थाचें मोठें दुकान आहे. त्यांच्या आग्रहास्तव एक दिवस येथें राहिलों; व दुसऱ्या दिवशीं सकाळीं ६ वाजतां निघून कर्णप्रयागला गेलों.

**कर्णप्रयाग**

येथें कर्णगंगा व अलकनंदा यांचा संगम आहे. संगमांत स्नान करून यात्रेकरू गांवांत जातात. अलकनंदेच्या पुलापासून गांव दोन फर्लांग आहे. कर्णराजाचें सुंदर मंदिर आहे. राजा कर्णानें येथें तपश्चर्या केली होती अशी वदंता आहे.

बदरीनारायणाची यात्रा येथें संपते. राणीखेत मार्गानें नैनी-तालला जाऊन तेथील दृश्य पहायचें व मग हरिद्वारला जायचें असें आम्हीं ठरविलें होतें. हरिद्वारला आमचें सामान ठेवलेलें होतें तें घेऊन वर्ध्यास परत जायचें होतें. कर्णप्रयाग ते राणीखेतचें वर्णन खालीं देत आहें.

ह्या यात्रेंत बदरीनारायणाच्या स्वामीजींची आम्हांला थोडी मदत मिळाली. कर्णप्रयागहून आम्ही मेहतचोरीला गेलों. चिंतामणी भाईंच्या गांवाला (चौखूरमल्ला) येथून च रस्ता जातो . त्यांनीं

आपल्या घरीं येण्याचा आम्हांला आग्रह केला. बारा मैलांची चढण चढावी लागत असल्यामुळें रस्ता फार त्रासदायक होता. आमचा नकार ऐकून ते म्हणाले, ' तुम्ही तर म. गांधींच्या आदेशानुसार वागणाऱ्या आहांत. आमच्या गांवीं गेल्यानें आमच्या गढवाल प्रदेशाची थोडीशी तरी कल्पना तुम्हांला येईल, म्हणून च मी तुम्हांला विशेष आग्रह करीत आहे. इतर तिघींनीं थकल्यामुळें नकार च दिला. त्यांच्या अनुमतीनें मी मात्र राणीखेतला त्यांना पुन्हां भेटायचें असें ठरवून श्री. चिंतामणी भाईबरोबर निघालें. त्या तिघी जणी सरळ राणीखेतच्या मार्गाला लागल्या.

**अंधाऱ्या रात्रींचा अनुभव**

आम्ही चौखूरमल्ल्याला जाण्यासाठीं निघालों तेव्हां आकाश अभ्राच्छादित होतें. त्यामुळें वेळेचा ठीक अंदाज लागला नाहीं. पांच मैल गेल्यानंतर च अंधार पडूं लागला व पाऊस हि सुरू झाला. मुक्काम गांठण्यासाठीं आम्ही चालू लागलों; पण कशा हि परिस्थितींत मुक्कामावर पोंचणें शक्य नव्हतें. आम्ही पर्वताचें अणकुचीदार टोंक गांठलें होतें. तेथून तीन चार मैलांचा उतार अजून उतरून जायचें होतें. कृष्णपक्षाची रात्र असल्यामुळें रस्ता मुळीं च दिसत नव्हता. आम्हांला चालणें अशक्य झालें. रस्ता शोधून शोधून चिंतामणीभाई थकून गेले. निराश झाल्यामुळें व थकून गेल्यामुळें ते एका जागीं निश्चल उभे राहिले. मी ह्या वेळीं पर्वताच्या शिखरावरून एक विचित्र दृश्य पाहत होतें. ती गंभीर निशा मला गोड वाटत होती. आपल्या नक्षत्ररूपी नयनांनीं मजकडे पाहणारें आकाश डोक्यावर होतें व पर्वताच्या पायथ्याशीं असलेल्या गांवांतील दिवे खालच्या बाजूस पृथ्वीवर उतरलेल्या तारकांप्रमाणें दिसत होते. दिवे एका च बाजूला असते तर त्यांमुळें पर्वतांतील मार्ग शोधण्याला मदत झाली असती.

खालच्या बाजूस चमकणारे दिवे पाहून असें वाटे कीं जणूं अनादि कालापासून आकाशांत फिरत राहिल्यामुळें थकलेले तारे विश्रांति घेण्यासाठीं पृथ्वीवर उतरले आहेत. पर्वत-शिखराच्या खालच्या बाजूस पसरलेल्या अंधकारमय रात्र-कूपांत टिमटिमणारे हे दिवे रेताड मैदानांतील मृगजलाप्रमाणें भुलवीत होते. सर्व बाजूंनीं दूरपर्यंत तारे च तारे ! कांहीं वेळ तर स्वत:च्या शरीराचें हि भान विसरून मी त्या दैवी भावांत निमग्न होऊन गेलें.

मार्ग सांपडण्याची आशा न राहिल्यामुळें चिंताग्रस्त होऊन चिंतामणीभाई मजकडे आले व म्हणाले, "ताई, माझ्या गाफिल-पणामुळें व चुकीमुळें आज अशा ह्या अंधाऱ्या रात्रीं तुम्हांला इतका त्रास सोसावा लागत आहे. काय करूं? रस्ता मुळीं च दिसत नाहीं. मला क्षमा करा." त्यांची चिंता व दु:ख याची मला चांगली कल्पना होती. त्यांना समाधान वाटावें म्हणून मीं म्हटलें, "चिंता कशाला करायची ? ईश्वर आपला पाठीराखा आहे. ह्या गंभीर रात्रीं ईश्वर आपली परीक्षा घेत आहे. त्याचे चिंतन करीत च ही रात्र आपण घालवूं या." ईश्वरचिंतनाखेरीज आम्ही दुसरें करूं हि काय शकत होतों? कशी तरी रात्र काढली. पहांटेचा अधुक प्रकाश दिसूं लागला. प्रार्थनेनंतर चिंतामणराव रस्ता शोधूं लागले व सकाळीं ८ वाजतां आम्ही त्यांच्या घरीं पोंचलों. तेथें सर्व जण आमची वाट च पाहत होते. फार प्रेम-पूर्वक भेटले. मी तर फार थकून गेलें होतें. स्नान व भोजन करून मी जी झोंपलें ती संध्याकाळीं च जागी झालें. तेथील भगि-नींशी गप्पागोष्टी करण्यांत तो दिवस निघून गेला.

**कमाल गरिबी**

आतां मी येथील परिस्थितीचें अध्ययन करूं लागलें.

पहिल्या दिवशीं माझ्या विशेष कांहीं च लक्षांत आलें नाहीं. नंतर त्या लोकांच्या भीषण गरिबीचें चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभें राहिलें. स्वत: चिंतामणीभाई हि गरीब च होते. पहिल्या दिवशीं त्यांच्या घरीं जें दूध, तूप दिसलें तें कोणा शेजाऱ्याकडून माझ्यासाठीं आणलें होतें. हें कळलें तेव्हां मला फार वाईट वाटलें. त्यांच्या घरांत दिव्याचें तेल हि नव्हतें. देवदारूच्या झिलप्या जाळून त्या उजेडांत रात्रीं दहा वाजेपर्यंत धान कुटण्याचें काम चाले. घरोघरीं ही च स्थिति. कोठें कोठें तर ह्यापेक्षां हि वाईट स्थिति आहे. एक दिवस दुपारीं गांवांतील कांहीं मुली माझ्याजवळ येऊन उभ्या राहिल्या. त्यांचे रुक्ष केस पाहून मी एकीची वेणीफणी करूं लागले. तिला मीं घरून तेल आणण्यास सांगितलें. ती घरीं गेली पण बरा च वेळ झाला तरी परत आली नाहीं. आपलें दारिद्र्य ती उघड करूं इच्छीत नव्हती. मीं तिला बोलावलें तेव्हां अगदी कोरडा, तेलाचा थेंब नसलेला, एक मेणचट लोटा घेऊन ती आली. तिची ही गरिबी पाहून प्रत्यक्ष दरिद्रनारायणाची मूर्ति माझ्या डोळ्यांसमोर उभी राहिली.

संध्याकाळीं मी शाळा पाहण्यास गेलें. ३५-४० मुलें बसलीं होतीं. दुर्बल रोडकीं शरीरें, खोल पिवळे चेहरे, निस्तेज डोळे, व जुने फाटके कपडे; हें पाहून माझें हृदय भरून आलें. शाळेंत मुलगी एक हि नव्हती. शिक्षकाला विचारलें तेव्हां कळलें कीं, शेतीचीं सर्व कामें स्त्रिया च करतात. पुरुष बहुधा बाहेर शहरांत नोकरी वगैरे करतात. मुलींना शिकविलें तर त्यांना शेती करणें आवडणार नाहीं. तेथील स्त्रियांची स्थिति रात्रंदिवस नांगर वाहणाऱ्या गरीब शेतकऱ्याच्या बैलापेक्षां चांगली नव्हती. मीं असें हि ऐकलें कीं शेतीच्या कामाची सोय व्हावी म्हणून पुरुष

तीन चार स्त्रिया हि करतात. ही पद्धति भारतीय संस्कृतीशीं विसंगत आहे. कारण त्यामुळें एकपत्नीव्रत राहत नाहीं. सदाचाराच्या कोणत्या हि नियमांत ही पद्धत बसत नाहीं. स्वत:ची वाईट स्थिति लक्षांत घेऊन तिचा प्रतिकार करण्याची शक्ति तेथील स्त्रियांत नाहीं. मी एकटी यात्रा करीत आहे हें पाहून त्यांना अपार आश्चर्य वाटलें. कांहीं लोकांनीं आग्रह केल्यामुळें रात्रीं मोडक्या तोडक्या भाषेंत स्त्रियांच्या परिस्थितीबद्दल मीं आपले विचार प्रकट केले. गप्पागोष्टींत कळलें कीं गांवाच्या सेवेसाठीं तेथें एक आश्रम स्थापण्यांत आला होता. पण सन १९३२ मधें सत्याग्रहाच्या काळांत तो सरकारनें जप्त केला.

चिंतामणीभाईच्या घरीं मगनचरखा होता. ते स्वत:, त्यांची पत्नी व नऊ वर्षांची मुलगी, त्यावर कांतीत. कापड विणून घेत असत. त्या डोंगराळ प्रदेशांत वस्त्रस्वावलंबनाचें हें अनुपम दृश्य मला ह्या च घरीं दिसलें.

तिसऱ्या दिवशीं त्या लोकांचा निरोप घेऊन मी चिंतामणीभाईबरोबर राणीखेतला जाऊन आपल्या मैत्रिणींना भेटलें.

राणीखेतला जातांना द्वाराहाट नांवाचें एक कसब्याचें गांव लागतें. येथें एक कॉंग्रेस कार्यकर्ता लोकर कांतण्याचें, व घोंगडी, पश्मीना, इत्यादि विणण्याचें काम करतो. मीं त्याच्याजवळून पश्मीन्याच्या दोन चादरी विकत घेतल्या.

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 21961 दि: 25-4-1916
क्रमांक 263 नों: दि: 15/7/1

## ७

# परतीचा प्रवास

### राणीखेत

हें गांव एका फार उंच पर्वत-शिखरावर वसलें आहे. हवापाणी आरोग्यदायक आहे. एका कॉंग्रेसी माणसाकडे स्नान, जेवण करून दुपारीं दोनच्या सुमारास मोटारनें आम्ही नैनीतालला जाण्यास निघालों.

### नैनीताल

हें मोठें शहर आहे. येथें इंग्रजांची वस्ती बरी च आहे. मोठमोठे बंगले व विदेशी वस्तूंनीं सजविलेलीं दुकानें जणूं गरिबांच्या खतावर पोसलेल्या झाडाप्रमाणें मला वाटली. हें शहर म्हणजे आधुनिक विज्ञान-युगांत मानवानें कमाविलेली आसुरी शक्ति प्रगट करणारा एक पुरावा च आहे. उन्हाळ्यांत संयुक्त प्रदेशाचे गव्हर्नरसाहेब येथें च राहतात. चिंतामणीजींचे बंधु येथें सरकारी कचेरींत क्लार्क आहेत. आम्ही त्यांच्याकडे तीन दिवस आरामांत राहिलों. येथून आगगाडीनें आम्ही हरिद्वारला गेलों. येथें ताराबाईंच्या आठवणीमुळें माझें हृदय व्याकुळ होऊं लागलें. त्यांच्या निमित्तानें च आमची ही यात्रा घडली; पण आज त्या आमच्यांत नव्हत्या. वर्ध्यास जाऊन आपल्या आश्रमवासियांना काय सांगूं ? असा विचार मनांत आला. यात्रेला निघतांना आम्ही पांच जणी होतों. पण आतां चार च जणी परत जाणार ! हृदय भरून आलें; पण करणार काय ?

हरिद्वारहून सामान घेऊन आम्ही दिल्लीस आलों. गांधी-आश्रमांत उतरलों. स्नान, भोजन वगैरे करून लाल किल्ला पाह-

ण्यास गेलों. सायंकाळीं हरिजन आश्रमांत गेलों. हरिजन विद्यार्थी पाहून फार आनंद झाला. येथें नीलाबाईंना विषमज्वर झाला. आम्ही आठ दिवस थांबलों. शेंवटीं देवकीबाईंना त्यांच्या सेवेसाठीं मागें ठेवून मी व लीलाबाई आग्रा, मथुरा व वृंदावन पाहून वर्ध्यास पोंचलों.

वर्धा जवळ आलें तेव्हां आम्ही दोघी जणी फार उदास झालों होतों. एक तर ताराबाईंचा आधीं च वियोग झाला होता व आतां नीलाबाईंना आजारी अवस्थेंत च दिल्लीस सोडावें लागलें होतें. यात्रेचा संकल्प केला तेव्हांपासून वर्ध्यास परत येईपर्यंतचीं सर्व दृश्यें अंतश्चक्षूंसमोर फिरत होतीं. सर्व एका स्वप्नाप्रमाणें वाटत होतें.

यात्रेंत ज्या सद्गृहस्थांनीं आम्हांला प्रेमपूर्वक साहाय्य केलें त्यांची मी आभारी आहें. त्याबरोबर च आमची जी सोय ह्या यात्रेंत झाली व आम्हांला जी सफलता लाभली ती म. गांधीजींच्या कृपेमुळें च हें हि विसरूं शकत नाहीं. त्यांच्या आशीर्वादाचा च हा प्रभाव होता.

**उपसंहार**

अशा प्रकारें माझी हिमगिरी-यात्रा पूर्ण झाली. पुष्कळ दिवसांची अभिलाषा तृप्त झाली. इतकी कठिण यात्रा तडीस गेली ह्याचें मला कांहींसें आश्चर्य वाटलें. जगांतील सर्वांत मोठा असा हिमालय पर्वत कोणीकडे व कोणीकडे त्यावर फिरणाऱ्या आम्ही लहान लहान बालिका! उन्नत हिमालयाचीं शिखरें मीं पाहिलीं. तेथील देखाव्यांचा आनंद लुटला. माझा आनंद गगनांत मावेना. दैवी दृश्यें पाहतां पाहतां मला स्वत:चा विसर पडे. हिमालयाच्या दिव्य विभूति पाहून भगवंताचे शतमुखानें गुणानुवाद केल्याखेरीज

राहवत नसे. ह्या यात्रेमुळें माझा आत्मविश्वास व परमात्म्यावरील विश्वास अधिक दृढावला.

हिमगिरी-यात्रेची उत्कट इच्छा तर पूर्ण झाली. पण बद्रीनाथला कैलास व मानस सरोवराची हकीकत ऐकून ती यात्रा करण्याची इच्छा उद्भवली. माझ्या मैत्रिणी हि ह्या बाबतींत माझ्याशीं सहमत होत्या. ह्या च वेळीं अशी एक घटना घडली कीं ज्यामुळें आम्हांला आमची ही इच्छा अनंत काळपर्यंत आवरावी लागली. आतां तर ती पूर्ण करणें स्वप्नवत् च वाटतें. यावेळीं एका मैत्रिणीला ताप येऊं लागला. ताराबाईंच्या मृत्यूनें आम्हांला आधी च चांगलें सावध केलें होते. म्हणून च आम्ही कैलास-यात्रेचा विचार सोडला.

दरिद्री भारतीयांची सेवा हा च आतां माझा कैलास आहे. त्यांच्या सुखसमृद्धीचा प्रयत्न करणें हा च माझ्या ह्यापुढील जीवन-यात्रेचा उद्देश, व हें च माझ्या मनोरंजनाचें साधन ! असो.

पू. काकासाहेब व इतर गुरुजनांच्या आज्ञेनें च मीं आपल्या यात्रेचे हे अनुभव मोडक्या तोडक्या भाषेंत प्रकट करण्याचें साहस केलें. माझे हे अनुभव वाचून जर कोणा वाचकास निसर्ग-रमणीयतेचें भांडार असलेल्या हिमालयाच्या दर्शनाची इच्छा झाली तर माझे हे प्रयत्न सफल झाले असें मी समजेन.

—ः समाप्त ः—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें.
क्र. ७८८५
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलांतर
अनुक्रम २४७९ दि. ७२-१ पासे

REFBK-0007884

REFBK-0007884